# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. २२/२०१२** दिनांक १२.१२.२०१२

**स्थळ - शिर्डी कार्यालय (साईनिवास अतिथीगृह)** वेळः- दुपारी **०४.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची विशेष सभा बुधवार दि.१२.१२.२०१२ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-४११०-२०१२, दिनांक ११ डिसेंबर, २०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा बुधवार दि.१२.१२.२०१२ रोजी दुपारी ०४.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष

०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, सदस्य

डॉ.यशवंतराव वसंतराव माने,
उपकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस मा.अध्यक्ष महोदय यांच्या पुर्व परवानगीने मा.श्री.किशोर मोरे, सदस्य तथा कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे सभेस अनुपस्थित होते, त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

सदरहू सभेमध्ये नाताळ सुट्टयांचे कालावधीत शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांच्या गर्दीचे नियोजन व संस्थानच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत नियोजन ठरविणेसाठी खालील संबंधीतांनाही मा.जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडून कळविण्यात आले होते त्यानुसार खालील संबंधीत उपस्थित होते.

०१. मा.श्री.आर.डी.शिंदे, पोलिस अधिक्षक, अहमदनगर
०२. मा.सौ.सुनिता ठाकरे, अप्पर पोलिस अधिक्षक, अहमदनगर
०३. मा.श्री.सुहास मापारी, उपविभागीय दंडाधिकारी, श्रीरामपुर
०४. मा.श्री.एस.टी. अल्वारिस, उपप्रादेशीक परिवहन अधिकारी, भाग श्रीरामपुर
०५. मा.श्री.विवेक पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी, शिर्डी
०६. मा.श्री.डी.टी.पवार, पोलिस निरीक्षक, शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी
०७. मा.श्री.भोळे, उप-पोलिस निरीक्षक, वाहतुक शिर्डी पोलिस स्टेशन
०८. मा.श्री.भागवत जायभाये, पोलिस निरीक्षक, मंदिर सुरक्षा
०९. मा.श्री.के.आर. पडवळ, पोलिस निरीक्षक, जि.वि.शा., अहमदनगर
१०. मा.श्री.आप्पासाहेब शिंदे, तहसीलदार राहाता
११. मा.श्री.उत्तम चंद्र गौड, स्टेशन प्रबंधक, साईनगर शिर्डी रेल्वे स्टेशन
१२. मा.श्री.बाळासाहेब कोते, बसस्थानक प्रमुख, राज्य परिवहन शिर्डी

यानतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **श्री साईबाबा मंदिर व दर्शन लाईन, मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्प आराखडा याबाबत आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई व आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांचे सादरीकरण पाहून निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** दिनांक २९/०७/२०१२ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांचे प्रतिनिधी आर्कि. किर्तीसागर बोल्लार यांनी नियोजीत मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्पाबाबत खालिलप्रमाणे सादरीकरण केले होते.

**I)** जने प्रसादालय परिसरातील सर्व इमारती काढून त्याठिकाणी भव्य अशा दर्शन रांग संकूल इमारतीचे बांधकाम करणेत येईल. सदर इमारतीमधे काही तळघर भागात व त्यावर दोन मजले असतील त्यापैकी तळघरात संस्थानचे काही कार्यालये, कर्मचारी वाहन पार्किंग व मटेनस विंग करीता जागा असेल. वरील दोन मजल्यांवर प्रत्येकी आठ याप्रमाणे एकूण १६ दर्शन रांग हॉल असतील.

**II)** मंदिर परिसरातील ऐतिहासीक महत्वाच्या इमारती वगळता इतर इमारती काढून विस्तीर्ण व सुशोभीत असा बगिचा करण्यात येईल. दर्शन रांग इमारती पासून समाधी मंदिर पर्यंत अंडरपास असेल. याशिवाय बुक स्टॉल, कापडकोठी, देणगी काऊंटर लाडु काऊंटर, कॅंटीन इ. सुविधांसह कॅश काऊंटींग हॉल व प्रशासनाची काही कार्यालये यांचा समावेश असलेली एक इमारत मंदिर परिसरात प्रस्तावित करण्यात आली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट किर्तीसागर यांना खालीलप्रमाणे सूचना करणेत आल्या.

१. चप्पल व मोबाईल ठेवण्यासाठी येणाऱ्या व परत घेण्यासाठी येणाऱ्या साईभक्तांची गर्दी एकत्र (criss-crossing) होऊ नये यासाठी नियोजन करावे.

२. मुख्य दर्शन रांग इमारतीला एकाहून अधिक प्रवेश मार्ग असावेत.

३. नियोजीत दर्शन रांग इमारतीचे खालील बाजूस संपूर्ण क्षेत्रात तळघराचे बांधकाम करण्यात यावे.

४. प्रशासकीय कार्यालय करणेसाठी मुख्य दर्शन रांग इमारतीवर एक अतिरिक्त मजला वाढवावा.

५. सुरक्षाविषयक उपाययोजनांसाठी प्लॅन अंतिम करण्याअगोदर Security Consultant चा सल्ला घेणेत यावा.

६. गर्दीचे नियोजनाकरीता दर्शन रांग इमारत व समाधी मंदिर यांना जोडणाऱ्या दर्शन रांगेच्या अर्ध्या भागात Travellator बसविणेबाबत तांत्रिकदृष्टया तपासणी करावी .

सदरहू सभेतील निर्णय क्र. ६४५ अन्वये वरील सुचनांनुसार नकाशात सुधारणा करुन आर्कि. हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांनी सुधारीत नकाशे सादर करावेत असे ठरले आहे.

**ब)** दिनांक २९/०७/२०१२ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे आर्कि. पुष्कर कानविंदे हे उपस्थित होते. त्यावेळी मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्पासाठी त्यांनी एका महिन्याचे कालावधीत नकाशे सादर करावेत असे सदरहू सभेतील निर्णय क्र.६४५ अन्वये ठरले होते. त्यानुसार आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे यांनी दि.०५/०९/२०१२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे झालेल्या बैठकीत यांनी सदर प्रकल्पासाठी तयार केलेल्या संकल्पानात्मक नकाशांचे सादरीकरण केले. या सादरीकरणातील काही ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१. समाधी मंदिरात एका तासाला जास्तीत जास्त १०,००० साईभक्त दर्शन घेवू शकतात ही बाब ध्यानात घेऊन दर्शन रांग इमारत डिझाईन करण्यात आली आहे.

२. जुने प्रसादालय परिसरात नविन दर्शनरांग इमारत प्रस्तावीत करताना साईनिवास गेस्ट हाऊस व सुलभ शौचालयाची इमारत तशीच ठेवलेली आहे.

३. नियोजीत दर्शन रांग इमारतीचे प्रवेशव्दाराजवळ साईभक्तांना मोबाईल व शुज ठेवणेसाठी व्यवस्था करणेत आली आहे. सात स्वतंत्र काउंटरवर साईभक्त सहजतेने आपल्या चप्पल, बुट व मोबाईल जमा करु शकतात. सदर इमारतीच्या तळघरात ०.४X०.४X०.५ मीटर मापाचे एकूण २१६०० लॉकर्स सदर वस्तु ठेवणेसाठी बनवता येतील. तसेच मंदिरातून परत आल्यावर इमारतीचे दक्षीणेकडून स्वतंत्र ठिकाणाहून भक्तांनी जमा केलेल्या वस्तु घेता येतील.

४. शुज व मोबाईल जमा केल्यावर ४५ स्वतंत्र चेकींग पॉईट वरुन साईभक्तांची चेकींग करुन त्यांना इमारतीचे मुख्य हॉलमध्ये सोडणेत येईल.

५. इमारतीचे मुख्य हॉलमध्ये साईभक्तांकरीता बाथरुम टॉयलेटची व्यवस्था तसेच अल्पोपहार व जलपानाची व्यवस्था करणेत आली आहे.

६. मुख्य हॉलमधून स्वयंचलीत शिडीच्या सहाय्याने पहिल्या मजल्यावरील दर्शन रांगेपर्यंत पोहचविण्यात येईल.

७. पहिल्या मजल्यावर प्रत्येकी १६०० साईभक्त सामावतील असे ०३ हॉल असतील तसेच १६०० साईभक्तांचे क्षमतेचा एक buffering हॉल असेल. त्याच प्रमाणे दुसऱ्या मजल्यावर १६०० साईभक्त सामावतील असे ०४ हॉल असतील.

८. प्रत्येक हॉल मध्ये पुरूष व स्त्रियांकरीता टॉयलेट्स असतील तसेच एका भव्य स्क्रिनवर मंदिरातील Live दृष्ये प्रदर्शीत केली जातील.

९. प्रत्येक हॉल एका कॉरीडॉरला जोडलेला असेल त्यातून समाधी मंदिराकडे दर्शन रांग लावली जाईल. सदरची दर्शन रांग अभिनेता मनोज कुमार गोस्वामी रस्त्याला समांतर एका स्काय वॉक व्दारे मंदिर परिसरात प्रवेश करेल.

१०. सध्या मंदिर परिसरात काहीही बदल सुचविलेला नाही.

वरीलप्रमाणे सादरीकरणाबाबत दिनांक ०८/१०/२०१२ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेत खालिलप्रमाणे निर्णय समंत झाला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे यांचे सादरीकरण पाहून मा.त्रिसदस्यीय समितीने त्यांना खालील बाबींचा समावेश करणेबाबत सूचना केल्या.

१. शुज स्टॅण्डजवळ शुज काढणेकरीता बसण्याची व्यवस्था करावी. तसेच साईभक्तांचे शुज ठेवणे व परत देणेसाठी मेकॅनाईज्ड यंत्रणा असावी.

२. समाधी मंदिर परिसरातील ऐतिहासीक वास्तु व्यतिरिक्त इतर इमारती काढून परिसर मोकळा करणेत यावा.

३. दर्शन रांग इमारतीचे चौथ्या मजल्यावर संस्थान कार्यालये करावीत. तसेच त्यांची वाहने पार्किंग करीता तळघरात व्यवस्था करावी.

४. मंदिर परिसरात व जुने प्रसादालय परिसरात चालणाऱ्या इतर गतीविधी उदा. देणगी काऊंटर, कापड कोठी, उदी प्रसाद, पुस्तक विक्री केंद्र, लाडू काऊंटर व प्रथमोपचार केंद्र इ. करीता स्वतंत्र व सुनियोजित व्यवस्था करणेत यावी.

आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांनी नकाशात वरीलप्रमाणे सुधारणा करुन मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करावेत, असे ठरले."

आता वरीलप्रमाणे सूचनांनुसार सुधारीत नकाशांचे सादरीकरणासाठी आर्कि. हाफिज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई व आर्कि. पुष्कर कानविंदे यांना आजचे सभेपुढे बोलवणेत आले आहे. तरी त्यांचे सादरीकरण पाहुन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.११०४ आर्किटेक्ट हाकिज कॉन्ट्रॅक्टर यांचे प्रतिनिधी आर्किटेक्ट किर्तीसागर बोल्लार यांना त्यांचे पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे आजचे सभेपुढे उपस्थित राहता येणार नाही, असे ई-मेलद्वारे कळविले होते, त्याची नोंद घेण्यात आली.**

आर्किटेक्ट पुष्कर कानिविंदे (दि ऑडी ग्रुप) पुणे यांचे प्रतिनिधी आर्किटेक्ट अमेय जोशी हे आजचे सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी उपरोक्त प्रकल्पाच्या आराखड्यांचे सभेपुढे सादरीकरण केले. त्यामध्ये जुन्या प्रसादालय इमारतीचे जागेवर नवीन दर्शन रांग इमारत प्रस्तावीत करण्यात आलेली होती. सदरचे इमारतीमध्ये प्रत्येकी १६०० व्यक्ती इतक्या क्षमतेचे एकुण ०६ हॉल दर्शविण्यात आले आहेत. म्हणजेच दर्शन रांगेची एकुण क्षमता १०००० व्यक्ती इतकी आहे. तसेच जुने प्रसादालय परिसरातले साईनिवास अतिथीगृह व सुलभ शौचालय या इमारती तशाच ठेवण्यात आलेल्या आहेत.

वरीलप्रमाणे सादरीकरण पाहिल्यानंतर सविस्तर चर्चा होऊन आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे यांचे प्रतिनिधीस समितीने खालीलप्रमाणे सुचना दिल्या.

०१) दर्शन रांग इमारतीची क्षमता एका वेळी किमान २५००० व्यक्ती इतकी असावी. त्याकरीता साईनिवास अतिथीगृह व सुलभ शौचालय या इमारती काढुन दर्शन रांग इमारतीची साईज वाढविण्यात यावी.

०२) नगर - मनमाड रस्त्यापासून नियोजित दर्शन रांग इमारतीचे अंतर १२ मीटर इतके दर्शविलेले असून ते पुरेशा प्रमाणात वाढविण्यात यावे.

०३) साईभक्तांना दर्शन रांग इमारतीत प्रवेश करणेसाठीची मुख्य प्रवेशव्दारे पाठीमागील म्हणजे पुर्व बाजूने करणेबाबत विचार करावा.

०४) नगर- मनमाड रस्त्यालगत नियोजित दर्शन रांग इमारतीचे बाजूस सर्व्हीस रोड असावा व त्यानंतर साईभक्तांना थांबणेसाठी पुरेशी जागा असावी.

०५) साईभक्तांना चप्पल, बुट काढणेसाठी पायऱ्यांचे अथवा इतर योग्य त्या स्वरुपात बैठक व्यवस्था असावी.

०६) अपंगांसाठी स्वतंत्र दर्शन लाईन, शौचालय व्यवस्था व इतर सुविधा आदींचा समावेश करणेत यावा.

**वरील सुचनांप्रमाणे आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे यांनी आराखड्यात सुधारणा कराव्यात. तसेच, यापुर्वी सादरीकरण केलेले आर्किटेक्ट हाफिज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई व आजचे आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांचे आराखडयांचे परिक्षण करण्यात येऊन अंतीम निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०२ नाताळ सुटी व नववर्षारंभ कालावधीत शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणा-या भक्तांच्या गर्दीचे नियोजन व मंदिर, मंदिर परिसराचे सुरक्षा व्यवस्थेबाबत तसेच इतर सुट्यांच्या / सणांच्या दिवशी होणारी नगर मनमाड रोड व इतर रोडवरील वाहतूक नियंत्रित करणेकामी करावयाच्या उपाय योजनांबाबत.**

**प्रस्ताव-** नाताळ सुटी २०१२ व नविन वर्षारंभानिमीत्ताने शाळा / कॉलेज यांना सुटया लागणार असल्याने श्री क्षेत्र शिर्डी येथे दि.२२/१२/२०१२ ते ०३/०१/२०१३ अखेर मोठया प्रमाणात भावीकांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने संरक्षण विभागामार्फत खालीलप्रमाणे गर्दीचे नियोजन करण्यात येत आहे.

१. नाताळ गर्दीचे काळात साईभक्तांची गर्दी होणार असलेने गर्दीचे नियोजनाकरीता सध्याचे सुरक्षागार्ड व्यतिरीक्त १७० कंत्राटी सुरक्षा रक्षक व आवश्यकता भासल्यास ५० आय.टी.आय. विभागातील विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून जादा घेणेस मंजूरी घेण्यात आलेली आहे.

२. गर्दीचे नियोजनाकरीता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेसाठी मा.जिल्हाधिकारी सो., मा.पोलिस अधिक्षक सो., अहमदनगर, शिर्डी पोलीस स्टेशन, वाहतुक नियंत्रण शाखा (आर.टी.ओ.) श्रीरामपुर यांचेशी पत्रव्यव्हार करणेत येत आहे.

३. दि.३१/१२/२०१२ रोजी मंदीर रात्रभर उघडे राहणार असल्याने साईभक्तांचे सोईकरीता जादा सुरक्षा कर्मचा-यांची नेमणूक करण्यात येणार आहे. तसेच सुरक्षीततेच्या दृष्टीने पोलिस विभागाकडील जादा कर्मचारी नेमणूकीबाबत, शिर्डी पोलिस स्टेशनची मदत घेत आहोत.

४. साईनगर मैदानावर साईभक्तांचे सोईसाठी तात्पुरते स्वरुपात कापडी शामीयाना मंडप उभारुन निवास व्यवस्था करण्यात येणार असल्याने तेथे भक्तांचे सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात येणार आहेत. तसेच मंडप उभारणी झालेनंतर मंडपामध्ये फायर एक्टींग्युशर बसविणेत येतील.

५. पिंपळवाडी रोडवरील दर्शनरांग येथे तात्पुरते स्वरुपात रिलींग तयार करुन व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच आवश्यकता भासलेस लोखंडी जाळया व दोर बांधून जादा दर्शनरांगेची व्यवस्था करण्यात येणार आहे.

६. दि.२२/१२/२०१२ ते ०३/०१/२०१३ पर्यंत संरक्षण विभागाकडील कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या रजा व सुटया बंद करण्यात आलेल्या आहेत.

७. सर्व सुरक्षा एजन्सीला गर्दीचे कालावधीत साईभक्तांची व्यवस्थीत चेकींग करणेबाबत व साईभक्तांशी सौजन्याने वागणे व बोलणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

८. मा.मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना संस्थानचे परिसराचे बाजूस असलेले रोडला फुटपाथवर स्टीकर, फुल, उद, फळ विक्रेते व इतर उपद्रवी व्यक्तींचा साईभक्तांना त्रास होणार नाही. याबाबत नियोजन करणेसाठी संबंधीतांना पत्रव्यवहार करीत आहोत.

९. नाताळ सुटयांचे कालावधीत साईबाबा भक्तनिवासस्थानचे कारपार्कीगमध्ये मंडप टाकण्यात येणार असल्याने भक्तनिवास येथे रुम घेतलेल्या साईभक्तांची वाहन पार्कीगची व्यवस्था साई आश्रम ०१ चे आवारामध्ये करणे आवश्यक आहे.

१०. साईबाबा भक्तनिवास ते पोलिस स्टेशन पर्यंत नगर-मनमाड रोडवर वाहने उभी राहू नयेत म्हणून शिर्डी पोलीस स्टेशनला संस्थानकडून क्रेन देणेत आलेले आहे.

११. दि.३१/१२/२०१२ रोजी साईभक्तांची गर्दी होणार असलेने जनसंपर्क कार्यालयामार्फत देण्यात येणारे पास बंद ठेवण्यात येणार आहे.

१२. दि.३१/१२/२०१२ चे भजन संध्याचे कार्यक्रमाचेवेळी ध्वनीक्षेपक वापराबाबत शिर्डी पोलिस स्टेशनकडून परवानगी घेत आहोत.

**निर्णय क्र.११०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावावर चर्चा चालु असताना खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**१. मंदिर परिसराचे चारही महाद्वारचे ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा मोर्चे उभारणे करीता पोलिस उपअधिक्षक यांचेकडून सुरक्षा मोर्च्यांची डिझाईन देण्यात येईल, त्यानुसार संस्थानमार्फत सुरक्षा मोर्चांची उभारणी करण्यात यावी. तसेच, सध्या मंदिर परिसरात असलेल्या निरिक्षण मनोऱ्यांची दुरुस्ती करुन ते कार्यान्वित करण्यात यावेत व आवश्यक त्या ठिकाणी नवीन निरिक्षण मनोरे उभारणेत यावेत.**

**२. नगर-मनमाड रस्त्यावर वाहतुकींची कोंडी होऊ नये, वाहतूक सुरळित चालणेसाठी संस्थान मार्फत ट्रॅफिक सिग्नल तयार करुन शिर्डी नगरपंचायत यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. तथापी, सदर सिग्नल शिर्डी नगरपंचायतीने त्वरीत ते कार्यान्वित करून, त्यासाठी करावी लागणारी दुरुस्ती करून ते शिर्डी पोलिस स्टेशनच्या ताब्यात द्यावे व शिर्डी पोलिस स्टेशनने नगर-मनमाड रस्त्यावरील येणाऱ्या-जाणाऱ्या व इतर गाडयांचा सर्व्हे करुन सिग्नलसाठी सायकलिंगचा टायमिंग फिक्स करुन दि.२०.१२.२०१२ चे अगोदर ट्रॅफिक सिंग्नल चालु करावे व यापुढील काळात त्याचे संपूर्ण नियंत्रण हे शिर्डी पोलिस स्टेशनने करावे. सिग्नल कार्यान्वित राहण्यासाठी करावे लागणारे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट व त्याचा खर्च शिरडी नगरपंचायतीमार्फत करण्यात यावा.**

**३. नगर मनमाड रोड व इतर रोडवरील वाहतूक नियंत्रित करणेकामी विविध ठिकाणी आवश्यक असलेले पार्कींग व इतर माहितीबाबतचे सुमारे २३० नग बोर्ड हे पोलसह तसेच श्री साईबाबा मंदिर गेट नं.१ समोरील व इतर ठिकाणी असलेल्या २०० नग बॅरीकेटर्सवर असलेल्या प्रत्येक गोल प्लेटवर रेडियम अथवा लाल रंगाने नो पार्किंग झोन असे गोलाकार आकारात लिहिणे हे साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी व शिर्डी शहर वाहतूक नियंत्रण सुरळीत होणेसाठी पोलीसांच्या वाहतुक विभागाकरीता अत्यंत महत्त्वाचे असून त्याकरीता संस्थानच्या निधीमधून वरील साहित्य संस्थानच्या विद्युत विभागामार्फत कोटेशन बोलावून खरेदी करणेस, संस्थानच्या बांधकाम खात्यामार्फत ते सिमेंट कॉंक्रीटमध्ये रोवून देणेस आणि सर्व मिळून येणा-या एकत्रित रु.१५,००,०००/- इतक्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली.**

**४. नाताळ सुट्टीच्या काळात नगर मनमाड रोड व इतर रोडवर साईभक्त तसेच स्थानिक ग्रामस्थ रस्त्यावर पार्कींग करतात, त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो याकरिता वाहतूक**

नियंत्रित करणेकामी शिर्डी पोलिस स्टेशनला छोटे क्रेन (टाटा मॉडेल-४०७) देण्यात आलेले आहे. याबरोबरच रस्त्यावरील गाडया उचलणेकामी एक मोठे क्रेन व उचललेल्या गाडया वाहुन नेणेकरीता एक मोठे वाहन, ड्रायव्हर विनाशुल्क संस्थानमार्फत देण्यात यावे.

५. नाताळ सुट्टीच्या काळात साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. याकरीता संस्थानचे शिर्डी येथील स.नं.१२४/ १२५ (साईनगर शेजारील), स.नं.५४, ५५ व निमगाव येथील गट नं.८७/८८ मध्ये पार्कींगची व्यवस्था करावी. याकामी, आवश्यकतेनुसार मुरुम टाकणे, पाईप टाकून रस्ते जोडणे, पार्कींग व इतर माहितीचे फलक लोखंडी स्टँडवर तयार करणे, सुरक्षा चौकी, तात्पुरते टॉयलेट ब्लॉक तयार करणे इत्यादी कामे करावीत, याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास व विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन काम करुन घेणेस मान्यता देण्यात आली.

६. गर्दीचे दिवशी (गुरुवार, शनिवार, रविवार व शासकिय सुट्या) श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे वाहनांची रहदारीवर नियंत्रण करणेकामी पोलिस स्टेशन, शिर्डी मार्फत जादा ट्रॉफिक पोलिस कर्मचारी सकाळी ०६ ते ०९ या वेळेसाठी नियुक्त करण्यात यावे, असे ठरले.

७. आपत्कालीन परिस्थितीमध्ये शिर्डी पोलिस स्टेशनसाठी आवश्यक असणारे वॉकी-टॉकी टॉवर संस्थानचे बांधकाम विभागामार्फत श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) किंवा साईआश्रम १ जवळ जागेची पहाणी करुन उभारणी करणेत यावे. तसेच वॉकी-टॉकी टॉवर ऑपरेटींगसाठीची व्यवस्था करणेत यावी.

८. प्रत्येक पार्कीगचे ठिकाणी दोन शिफ्टमध्ये श्री साई प्रसादालय व साईआश्रम येथे नेमणूक असलेल्या सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरमार्फत ०४ कंत्राटी सुरक्षा गार्ड नेमणेत यावेत.

९. शिर्डीमध्ये गर्दीच्या काळात साईभक्तांचे सुरक्षिततेकरीता येणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांसाठी संस्थानमार्फत मोफत भोजन देण्यात यावे. तसेच, निवासाकरीता कर्मचाऱ्यांसाठी हॉल आणि पोलिस अधिकाऱ्यांसाठी साध्या खोल्या देण्यात याव्यात.

वरील सर्व सुचना तातडीची गरज व साईभक्तांचे सुरक्षिततेसाठी असल्याने उपरोक्त कामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच, ठराव कायम होण्याची वाट न पाहता कोटेशन बोलाविणेची प्रक्रिया चालू करुन तातडीने पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/विद्युत विभागप्रमुख/बांधकाम विभागप्रमुख/निवासस्थान विभाग/अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.०३** **एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम (आय.एच.एस.टी.पी.) राबविण्यासाठी निमगाव गट क्रमांक २५० मधील संस्थान मालकीची जागा सशर्त आगाऊ ताब्यात मिळणेसाठी, शिर्डी नगरपंचायत यांचे विनंती पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी माहे जानेवारी, २००९ व तद्नंतर वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहारानुसार व तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयानुसार, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस दिनांक २६ डिसेंबर, २०११ रोजी, शिर्डी शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविणेकामी संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता हद्दीतील गट नंबर २५० पैकी मधील क्षेत्र ०१ हे ८५ आर ही जमीन शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस विनामुल्य हस्तांतरीत करणेस मान्यता देणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने, मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंवि-२०१२/५१/प्र.क्र.७/का.सोळा, दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे :

.. दरम्यानचे कालावधीत जनहित याचिका क्र. २७ /२०१२ प्रकरणी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने मा. प्रधान जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती नियुक्ती केली असून सद्य:स्थितीत श्री साईबाबा संस्थानचा कारभार सदर समितीकडून हाताळण्यात येत असल्याने उपरोक्त प्रस्ताव त्रिसदस्यीय समितीसमोर ठेवून समितीचे अभिप्राय घेण्यात यावेत, ही विनंती.

मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी कळविलेप्रमाणे विषयांकित प्रस्तावाबाबत मा. त्रिसदस्यीय समितीचे अभिप्रायार्थ खालीलप्रमाणे प्रस्ताव करणेत येत आहे :

**(ब) विषयाची पूर्वपीठीका:**

**०१.** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांच्या तत्कालीन नगराध्यक्षा तथा मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्या यांनी तसेच मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दिनांक २२ जानेवारी, २००९ रोजीचे पत्राने व तद्नंतर वेळोवेळी करणेत आलेल्या पत्रव्यवहाराने, केंद्र शासनाच्या शहरी विकास व शहरी रोजगार दारिद्रय निर्मुलन मंत्रालयाने, जवाहरलाल नेहरु पुनरुत्थान अभियानांतर्गत शिर्डी

शहरातील झोपडपट्टीवासियांचे निर्मुलन व पुनर्वसन करणेसाठी, शिर्डी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविणेसाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट क्रमांक २५० पैकीमधील जमीन मिळावी म्हणून विनंती केलेली होती.

**०२.** उपरोक्त प्रस्तावावर, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७५ (३६) नुसार, संस्थान मालकीच्या मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नंबर २५० पैकी मधील आवश्यक अशी जागा / जमीन उपलब्ध करुन देणेस अधिनियमातील तरतुदीस व शासनाच्या मान्यतेस अधिन राहून तत्वतः मान्यता देणेत आली.

**०३.** मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, इकडील दिनांक ३० जानेवारी, २००९ रोजीचे पत्राने मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना, शिर्डी शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमासाठी संस्थानमार्फत जागा उपलब्ध करुन देणेबाबत, अधिनियमातील तरतुदीस व शासन मान्यतेस अधिन राहून तत्वतः मान्यता देणेत आलेली आहे, तसेच शिर्डी शहरातील झोपडपट्टीवासियांचे प्राथमिक सर्व्हेक्षण करुन, याकामी किती जमीन उपलब्ध करुन द्यावी लागेल, याबाबतचा प्राथमिक अहवाल संस्थानकडे सादर करणेबाबत कळविणेत आले होते. तसेच, इकडील दिनांक १९ जुलै, २०११ रोजीचे पत्राने, विषयांकित प्रकल्पासाठी नियोजित केलेली संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर २५० क्षेत्र ०१ हे ८५ आर आवश्यक आहे किंवा कसे, तसेच सदर जमिनीची किंमत सन २०११ चे शासकीय मुल्यांकन तक्त्यानुसार रुपये ८०.९३ लक्ष होत आहे, ती देणेस तसेच जागा हस्तांतरणासाठी येणारा खर्च करणेस नगरपंचायत तयार आहे किंवा कसे, याबाबत विचारणा करणेत आली होती.

**०४.** त्यावर, मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक २२ सप्टेंबर, २०११ रोजीचे विनंती पत्राने खालीलप्रमाणे कळविले होते, त्याचा थोडक्यात तपशील :

१. मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट क्रमांक २५० क्षेत्र ०१ हे ८५ आर चे जमिनीची किंमत, सन २०११ चे शासकीय मुल्यांकन तक्त्यानुसार रुपये ८०,९३,७५०/- इतकी नगरपंचायतीस भरणे शक्य होणार नाही, तरी सदर जागा नगरपंचायतीस विनामुल्य मिळावी.

२. सदरची जागा बक्षीसपत्राने घेणेसाठी बक्षीसपत्र नोंदविण्यासाठी मुद्रांक शुल्क, नोंदणी फी इ. येणारा खर्च शिर्डी नगरपंचायत करण्यास तयार आहे.

३. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत ३७६ घरे बांधण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीने सादर केलेल्या प्रकल्प अहवालास केंद्र शासनाने त्यांचेकडील दिनांक २७ जुन, २०११ रोजीचे पत्राने मंजुरी दिलेली आहे. सदर प्रकल्पाचा खर्च अंदाजे रुपये ७७३.७३ लक्ष मात्र इतका आहे.

**०५.** तद्नंतर, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे उपरोक्त दिनांक २२ सप्टेंबर, २०११ रोजीचे विनंतीपत्र- वजा- प्रस्तावावर तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ व दिनांक १४ जानेवारी, २०१२ रोजीचे सभेत अनुक्रमे निर्णय क्रमांक ८११ व ०१ मध्ये खालील निर्णय घेणेत आलेला होता :

.. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना त्यांनी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शिर्डी शहरातील झोपडपट्टी निर्मूलन करणे / झोपडपट्टीवासियांचे पुर्नवसन करणेसाठी मा. शासनाने नगरपंचायतीच्या मंजूर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन शिर्डी शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविणेसाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर २५० पैकी मधील क्षेत्र ०१ हेक्टर ८५ आर ही जमीन विनामुल्य उपलब्ध करुन देणेत यावी / हस्तांतरीत करणेत यावी. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी जमीन हस्तांतरणासाठी करावे लागणाऱ्या बक्षिसपत्राचा नोंदणी खर्च (मुद्रांक व नोंदणी शुल्क आदि) करावा. संस्थान वकिलांमार्फत नगरपंचायतीकडून प्राप्त होणारा बक्षिसपत्राचा मसुदा तपासणी करणे, अभिप्राय घेणे आदि कार्यवाही करणेत यावी, याकामी लागणारा अनुषंगिक खर्च संस्थानने करावा. तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार मा. शासनाकडे जमिनीचे विनामुल्य हस्तांतरणासाठी प्रस्ताव सादर करुन शासन मान्यता घेणेत यावी, असे ठरले. याकामी संस्थान कायदे सल्लागार यांचा अभिप्राय घेण्यात यावा, असे ठरले. सदरहू निर्णयास मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांनी विरोध दर्शविला.

**०६.** दरम्यानचे कालावधीत, मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दिनांक ०४ नोव्हेंबर, २०११ व २५ नोव्हेंबर, २०११ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले होते :

.. .. सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून २७ जून, २०११ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. शिर्डी नगरपंचायत मार्फत प्रकल्पाच्या रु. ७,१७,३७,३१६/- मात्र रक्कमेच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली आहे. त्यापैकी रु.२८२.९२९ लक्ष एवढे अनुदान केंद्र शासनामार्फत दिनांक २५ ऑक्टोबर, २०११ रोजी नगरपंचायतीस प्राप्त झालेले असून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांचेकडील जा. क्र. प्राधि/ विनि/ मनिनि/ आयएचएचडीपी/ २७७९/ ११, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०११ रोजीचे पत्राने प्राप्त निधीचा विनियोग ज्या योजनेसाठी केला आहे, त्याच

योजनेसाठी तीन महिन्यात करणे आवश्यक आहे. अन्यथा शासनाचे परिपत्रक क्रमांक जनियो-२००९/ प्र.क्र.१२८/ गृनियो-२, दिनांक ०१ डिसेंबर, २००९ अन्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीवर पी.एल.आर.नुसार व्याज आकारण्यात येईल, याबाबतच्या सुचना दिल्या आहेत.

कृपया सदर योजनेकरीता प्रकल्पाच्या कामाच्या निविदा मागवुन प्रत्यक्ष कामास सुरुवात करावयाची असलेने व सदरचे काम शासनाने ठरवुन दिलेल्या मुदतीत करावयाचे असल्याने प्रकल्पाची जागा गट क्रमांक २५० मधील क्षेत्र ०१ हे ८५ आर नगरपंचायतीकडे त्वरीत वर्ग करणेस विनंती आहे.

**०७.** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयांनुसार, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस इकडील दिनांक २६ डिसेंबर, २०११ रोजीचे पत्राव्दारे, विषयांकित प्रकल्प राबविणेसाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर २५० मधील क्षेत्र ०१ हेक्टर ८५ आर ही खुली जागा/ जमीन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ण), कलम २१(२)(दोन) आणि कलम १७(३) तरतुदीनुसार शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस विनामुल्य हस्तांतरीत करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

**०८.** मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी परिच्छेद अ मध्ये नमुद केलेप्रमाणे दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजीचे पत्राने, विषयांकित प्रस्ताव त्रिसदस्य समितीसमोर ठेवून समितीचे अभिप्राय घेणेत यावेत, असे कळविले होते. त्यास अनुसरुन, मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक ०८-१०-२०१२ रोजी झालेल्या सभेपुढे अभिप्रायार्थ प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांच्या एकुण असणाऱ्या सर्व मागण्यांचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो पुढील सभेपुढे सादर करण्यात यावा असे सदरहु सभेत ठरले आहे.

**०९.** सद्यःस्थितीत आता शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी जा.क्र.न.पं./बांध /कावि-५/७१५/२०१२ दिनांक ०३-१२-२०१२ चे पत्राव्दारे खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

मा.श्री.सतीश गवई, उपाध्यक्ष, म्हाडा, मुबई यांनी त्यांचेकडील जा.क्र.एमएचमु.अ१/ उमुअकाअ-२/ प्रा/ जनयो/नक्र१२०-II/ २७१३ /२०१२ दिनांक ३०.११.२०१२ रोजीचे पत्रान्वये सदर योजनेतील घरकुलाचे बांधकाम तातडीने सुरु केले नाही तर सदर योजना रद्द करणेबाबत मा.प्रधान सचिव,गृहनिर्माण विभाग मुंबई यांना प्रस्तावीत केले आहे. तातडीने जागा हस्तांतरण करुन काम सुरु करणेबाबत सुचना केली आहे.

तरी वरील योजनेचे काम तातडीने सुरु करणेसाठी शासनाच्या मंजुरीस अधीन राहून सदरची जागा तातडीने सशर्त शिर्डी नगरपंचायतच्या ताब्यात द्यावी अथवा वरील योजनेअंतर्गत घरकुल बांधकाम सुरु करणेस आपला ना हरकत दाखला द्यावा, ही विनंती.

प्रकरणी आपण शासनाच्या मंजुरीस अधीन राहून सशर्त अगाऊ ताबा पावती नगरपंचायतीस करुन दिल्यास मा. उपअधिक्षक, नगरभुमापन कार्यालय, राहाता यांचेकडून मोजणी करुन योजनेचे काम सुरु करता येवु शकेल

प्रकरणी याबाबत तातडीने सहकार्य होणेस विनंती आहे.

शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचे वरीलप्रमाणे विनंतीस अनुसरुन विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यालयीन टिपणी सादर करण्यात येत आहे.

**(क) विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने महत्वाच्या बाबी :**

०१. मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी सन २००५ मध्ये जाहिर केलेल्या भूसंपादन निवाडयानुसार, मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील विखुरलेल्या स्थितीतील क्षेत्र ४५ हेक्टर ६४ आर या पूर्वी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मालकीच्या असलेल्या जमिनी संस्थानला भूसंपादनाच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. भूसंपादन कायदा, १८९४ मधील तरतुदीनुसार मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना करुन देणेत आलेल्या करारानुसार, सदरच्या जमिनी रुग्णालये व तद्अनुषंगाने इतर सार्वजनिक कामाचे / वापराचे प्रयोजनार्थ मिळालेल्या आहेत. या जमिनीपैकीच विषयांकित प्रकल्पासाठी उपलब्ध करुन द्यावयाची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर २५० पैकी मधील क्षेत्र ०१ हेक्टर ८५ आर ही जमीन आहे.

०२. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १४ जानेवारी, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७५ नुसार, मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील भूसंपादनाने मिळालेल्या जमिनींच्या वापराच्या प्रयोजनामध्ये भक्तोपयोगी / लोकोपयोगी विविध सार्वजनिक उपक्रमांसाठी / कामासाठी / विकास प्रकल्प राबविणे असा बदल करणेसाठी मा. महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस दि. ०७ ऑगष्ट, २०१२ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्ताव मा. शासन स्तरावर विचाराधीन आहे.

०३. विषयांकित प्रकल्पासाठी उपलब्ध करुन द्यावयाची संस्थान मालकीची जमीन ही संस्थानला भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेली असल्याने, सदर जमीन शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करुन देणेकामी मा. महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

०४. तसेच, विषयांकित प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील कलम १७ (२) (ण) मधील मानवजातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल तसेच कलम २१ (२) (दोन) मधील स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करणे या तरतुदींनुसार जमीन उपलब्ध करुन देता येईल. तथापि, तसेच अधिनियमातील कलम १७ (३) मध्ये विश्वस्तव्यवस्थे मध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही या तरतुदीनुसार संस्थानची स्थावर मालमत्ता नगरपंचायतीस विशिष्ट कारणासाठी उपलब्ध करुन देणेबाबत मा. शासनाची मंजुरी मिळणे आवश्यक राहील.

०५. मा. उच्च न्यायालय,मुंबई,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील पी.आय.एल. नं.१८/२०११ श्री.राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/ २०१२ मध्ये मे.कोर्टाने दिनांक १६-१०-२०१२ च्या आदेशाने संस्थानला काही निर्देश केले आहेत. त्यापैकी विषयांकित प्रकरणाशी निगडीत (Innovable Property) असलेला निर्देश खालीलप्रमाणे आहे.

६. We direct that, without prior permission of this Court, the Committee.

a) Shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2 – trust;
b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No. 2-trust;
c) shall not take any mojor financial decision of whatsoever nature;
d) shall not take steps to recurit staff, employees in regular vacancies;
e) shall not convert precious metals in any form nor melt in in any form;

**(ड)** उपरोक्त परिच्छेद क्र.(१) (२) (३) (४) व (५) मध्ये विवेचन केलेनुसार, शिर्डी शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविणेकामी संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर २५० पैकी मधील क्षेत्र ०१ हे ८५ आर जमीन शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना तातडीने सशर्त शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे ताब्यात बक्षिसपत्राने देणे अथवा न देणे याबाबत निर्णय होणेसाठी सादर.

**निर्णय क्र.११०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयाबाबत व्यवस्थापन समितीचे यापुर्वीचे निर्णयानुसार शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास (आय.एच.एस.टी.पी.) कार्यक्रम राबविणेसाठी मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.२५० मधील ०१ हेक्टर ८५ आर जमीन बक्षीस पत्राव्दारे विनामुल्य उपलब्ध करुन देणेसाठी तत्वत: मान्यता देणेत आली.**

**याबाबत, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी केंद्र सरकारकडून मंजूर होऊन आलेल्या प्रस्ताव आराखडयाचे व्यवस्थापन समिती सभेपुढे सादरीकरण करावे. प्रस्तावित जमिनीचे बक्षीस पत्राव्दारे हस्तांतर करणेसाठी शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतर मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे सिव्हील अर्ज करुन परवानगी घेणेत यावी. सदर परवानगी मिळाल्यानंतर व नोंदणीकृत बक्षीसपत्र झाल्यानंतर प्रस्तुत जमीनीचा ताबा शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देणेत यावा.**

**मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दिलेल्या माहितीनुसार शिर्डी शहरातील एकंदर सहा ठिकाणच्या जागेवरील झोपडपटटयांचे पुनर्वसन प्रस्तुत जमिनीत करणेत येणार आहे तसेच रिकाम्या होणाऱ्या जागेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेत येणार आहे.**

**(०१) नाला रस्त वसाहतीची जागा पाटबंधारे खात्याची आहे. सदरची जागा मोकळी झाल्यानंतर त्याठिकाणी नाला सुशोभिकरण करणे प्रस्तावित आहे.**

**(०२) आंबेडकर नगर वसाहतीची जागा पाटबंधारे खात्याची आहे. सदरची जागा मोकळी झाल्यानंतर त्याठिकाणी नाला सुशोभिकरण करणे प्रस्तावित आहे.**

**(०३) चारी क्रमांक १२ वसाहत ही जागा पाटबंधारे विभागाची आहे. सदरची जागा रिकामी झाल्यानंतर चारी बंदिस्त करुन पादचारी मार्ग विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.**

**(०४) भिमनगर वसाहत ही जागा गावठाण महाराष्ट्र शासनाची आहे. सदरची जागा रिकामी झाल्यावर त्याठिकाणी विकास योजनेतील आरक्षण क्र. १७ व १८ मध्ये सार्वजनिक शौचालय असल्याने, त्याठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधणे प्रस्तावित आहे.**

(०५) बिरेगांव रस्ता वसाहतीची जागा पाटबंधारे खात्याची असून रिकाम्या होणाऱ्या जागेचा उपयोग बिरेगांव रस्ता रुंदीकरणासाठी प्रस्तावित आहे.

(०६) लक्ष्मीनगर वसाहत जागेच्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, त्यावर महाराष्ट्र सरकार भुमिहीन शेतमजुर घरकुल योजना, महाराष्ट्र सरकार भुमिहीन घरकुले, दहन व दफनभुमि अशी नोंद आहे. त्याच स.नं. ३/४ खाली ०१ हेक्टर ०० आर घरकुले, स.नं. २/३ यातील ०० हेक्टर २५ आर व स.नं.२/३ यातील ०० हे. १५ आर घरकुले अशी पिक पाहणीस नोंद आहे. एकंदर ०१ हे. ४० आर पिक पाहणीत ०१ हे. ०० आर घरकुल अशी नोंद आहे. नगरपंचायत, शिर्डी यांनी कळविले आहे की, यामध्ये विकास योजनेतील १८ मीटर रस्ता विकसित करणे, असे प्रस्तावित आहे.

शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी रिकाम्या होणाऱ्या जागेवर प्रस्तावित केलेले काम करावे व त्यावर अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

लक्ष्मीनगर वसाहत ही संस्थानच्या नियोजित दर्शन हॉल प्रकल्पाच्या लगत असून सदर वसाहतीची एकंदर ०१ हे.४० आर जागा रिकामी होणार आहे. त्यातून विकास आराखडयातील १८ मीटर रुंदीची जागा वजा जाता, उर्वरित जागा साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी संस्थानला विनाअट देणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४ शिर्डी शहरातील संस्थानतर्फे विकसित करण्यात येत असलेल्या विकास योजना रस्त्यांचे कामांबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे दैनंदिन वाहतूकीचे दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या प्रथम प्राधान्य गटातील अंदाजे रुपये ८८ कोटी मात्र इतक्या रकमेची ११ रस्ते विकसीत करण्याची कामे संस्थान निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व संस्थान यांचेमार्फत करणेत येत आहे. त्यापैकी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांचेमार्फत सोबतच्या परिशिष्टातील ०५ रस्त्यांपैकी चार रस्त्यांची कामे पुर्ण केलेली असुन व्दारकामाई ते ताजीमखान बाबा चौक या भागातील रस्त्याचे काम ९ मीटर रुंदी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी उपलब्ध करुन न दिल्यामुळे पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे काम अपुर्ण आहे.

सदर रस्ते विकास प्रकल्पाबाबत मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांन्वये मान्यता मिळालेनुसार प्रथम प्राधान्यगटातील अकरा रस्ते विकसित करणेकामी संस्थानमार्फत सादर केलेल्या प्रस्तावास दि. १९/०९/२००८ रोजीचे शासन निर्णयान्वये रुपये २८ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे.

याकामी सुधारीत खर्चाचे प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी तत्कालीन विधी व न्याय मंत्री (महाराष्ट्र शासन) मा.राधाकृष्ण विखे पा. यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७ जानेवारी, २०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार या प्रकल्पाचे वाढीव खर्चासह एकूण रुपये ८८ कोटी मात्र इतक्या अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर मा. विधी व न्याय मत्री व मा. मुख्यमंत्री यांची मान्यता घेण्यात येईल असे ठरले होते. सदर बैठकीत ठरलेप्रमाणे सुधारीत प्रस्ताव (रुपये ८८ कोटी खर्चाचा) इकडील पत्र क्र.७४९३/२०१० दि. २६/०५/२०१० अन्वये सादर करणेत आलेला आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६४० अन्वये ठरलेनुसार सदर काम सुरु ठेवणे आलेले असून शासन स्तरावर मान्यता मिळणेकामी पाठपुरावा करणेत येत आहे.

संस्थान निधीतून हाती घेण्यात आलेल्या रस्त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशिल | अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या माध्यमातून विकसीत करण्यात येत असलेले- ०६ रस्ते. | ब) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांच्या माध्यमातून विकसीत करण्यात येत असलेले ०५ रस्ते |
|---|---|---|---|
| ०१ | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार | युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे | पेव्हटेक कन्सल्टंट, पुणे |
| ०२ | बांधकाम ठेकेदार | मे.रामन टारमॅट लि.,नवी मुंबई | मे.अशोका बिल्डकॉन लि.नाशिक |
| ०३ | मंजूर निविदा रक्कम | रु. ३३,८३,२६,१९९/- | रु. ९,३८,८०,५६० /- |
| ०४ | निविदा टक्केवारी | १०% कमी | १०% कमी |
| ०५ | कार्यादेश क्रमांक/ दि. | जा.क्र ८८३७ दि.०६/०८/२०१० | जा.क्र पुणे /९५७ दि.२१/०५/२०१० |
| ०६ | झालेल्या कामाची रक्कम (सल्लागार फीसह) | रु. ८,६८,१६,३२५/- नोव्हेंबर, २०१२ अखेर) | रु. ९.३० कोटी रस्ते विकास महामंडळास आदा करणेत आले. नोव्हेंबर, २०१२ अखेर) |
| ०७ | कामाची मुदत | १. १५ महिने (दि. ०६/०८/२०१० ते दि.०५/११/२०१२)<br>२. मुदतवाढ मे २०१३ अखेर | १. १२ महिने- कामाची मुदत मे २०११ अखेर<br>२. काम पूर्ण डिसेंबर, २०११ अखेर |

उपरोक्त रस्त्यांचे कामांतील अडचणीचे निवारण करून काम करणेसाठी रस्ते उपलब्ध करून देणेकामी शिर्डी नगरपंचायत यांना संस्थानमार्फत दि. २४/०८/२०१२, दि. २९/०९/२०१२, दि.

०१/०२/२०१२ व दि. ०७/०४/२०११ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. अद्यापही वर नमुद केल्यानुसार काही रस्त्यातील अडचणींचे निवारण झालेले नाही. तसेच रस्ता क्र.९अ चे भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली नाही. ठेकेदार सदर रस्ते उपलब्ध करून देणेकामी तगादा करीत आहे. तसेच याकामी निविदेनुसार देय भावफरक (Price escalation clause) रकमेव्यतिरिक्त आणखी दरवाढ मिळावी अशी मागणी करीत आहेत.

सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि. पुणे हेही देय फी व्यतिरिक्त वाढीव कालावधीसाठी अधिक फीची मागणी मा. त्रिसदस्य समिती सभेत दि. ०८ ऑक्टोबर, २०१२ रोजी सादर करणेत आली होती. सदर सभेत सल्लागार यांना समितीचे सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे ठरले आहे.

ठेकेदार रोमन टारमॅट यांचे काम संथ गतीने चालू आहे. त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या रस्त्यांचे कामाचा वाव विचारात घेवून कामाची गती वाढविणेबाबत तसेच सुरु असलेल्या रस्त्यांची कामे लवकर पूर्ण करणेबाबत वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. ठेकेदार यांनी कामाची गती वाढविण्यासाठी डिसेंबर २०१२ पासून आवश्यक सिमेंट व इतर मटेरियल, मशिनरी व मनुष्यबळ उपलब्ध करून काम सुरु केलेले आहे.

**निर्णय क्र.११०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील संस्थानतर्फे विकसित करण्यात येत असलेल्या विकास योजना रस्त्यांची कामे लवकर पुर्ण करणेबाबत चर्चा करणेसाठी, या कामाचे सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि. पुणे, ठेकेदार रोमन टारमॅट व मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांची एकत्रित बैठक बोलावणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.०५ **नाताळ सुट्टी २०१२ व नुतन वर्षारंभाचे कालावधीत करावयाच्या मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेची दरपत्रके उघडून त्यावर चर्चा/ वाटाघाटीव्दारे निर्णय होणेबाबत...**

प्रस्ताव- दिनांक २५ डिसेंबर, २०१२ ते दि. ०२ जानेवारी, २०१३ अखेर ०९ दिवस शैक्षणिक व इतर कार्यालयांना सुट्टया असतात. या कालावधीत श्री चे दर्शनासाठी साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने, मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरते निवास व्यवस्थेकरीता खालील ठिकाणी शामियाना मंडप कनात व बिछायतीसह, बॅरेकेटींग, बाथरुम व्यवस्थेसाठी पार्टीशन व्यवस्था ०९ दिवसाकरीता तसेच नववर्षाचे स्वागतासाठी स्वागत कमानी व कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था दि. २९.१२.२०१२ ते दि. ०१.०१.२०१३ अखेर पर्यन्त ०४ दिवस करुन घेता येईल.

**अ) नाताळ सुट्टी निमीत्ताने शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह व्यवस्थाः-**
**दि. २५ डिसेंबर, २०१२ ते दि. ०२ जानेवारी, २०१३ अखेर ०९ दिवस-**

**०१. शामियाना मंडप, पार्टीशन :-**

| अ.नं. | मंडप तपशिल | साईज | एकुण चौ. फुट |
|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्तनिवासस्थान पार्किंग दक्षिण बाजूस कनात व बिछायतीसह शामियाना मंडप साईभक्तांचे निवास व्यवस्थेसाठी | ४५'x ३९०' | १७,५५०.०० |
| ०२ | साईबाबा भक्तनिवासस्थान पार्किंग पश्चिम बाजूस प्रसाद भोजना करीता शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह | ३०'x ९०' | २,७००.०० |
| ०३ | साईनगर मैदानावर साईभक्तांचे निवासव्यवस्थेकरीता शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह | २००'X१००' | २०,०००.०० |
| ०४ | जुने प्रसादालय पार्किंगचे ठिकाणी कनात व बिछायतीसह | १००'X९०' | ९,०००.०० |
| ०५ | सभाकुंड येथील मोकळ्या जागेत कनात व बिछायतीसह | ६१'X६१' | ३,७२१.०० |
| ०६ | जुने प्रसादालय परिसरामधील लाडू विक्री काउंटर समोर | ६०'X २०' | १,२००.०० |
| | | एकुण चौ. फुट. | ५४,१७१.०० |

**०२. पार्टीशन व्यवस्थाः-**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांगच्या बाजूने शामियाना मंडपासाठी वापरण्यात येणाऱ्या कापडाची ६ फुट उंचीची कनात बांधून बाथरुम व्यवस्थे कामी ६' उंचीचे पार्टीशनची उभारणी करणे. | ११००.०० रनिंग फुट | ११००.०० |
| | | एकुण रनिंग फुट. | १,१००.०० |

**०३. दर्शन रांगेसाठी व श्री साई प्रसादालय येथे बॅरेकेटींग व्यवस्था :-**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांगकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी ४' उंचीचे लोखंडी पाईप / बांबू वापरुन भक्कम बांधी करुन बॅरेकेटींग करणे. | १००० रनिंग फुट | १,०००.०० |

ब) शिर्डी महोत्सव करीता स्वागत कमाणी उभारणी करणे:-

कालावधी दि. ३१.१२.२०१२ ते दि. ०१.०१.२०१३ अखेर ०२ दिवस.

०१. स्वागत कमाणी :-

| अ.नं. | मंडप तपशिल | साईज | परिमाण |
|---|---|---|---|
| ०१ | नगर - मनमाड रोडवर बॉक्स टाईप स्वागत कमाणी उभारणे. २०' उंचीच्या | १५ मिटर लांब | ०२ नग |
| ०२ | स्वागत कक्षा जवळ स्वागत बॉक्स टाईप कमाण उभारणे. २०' उंचीची | १५ मिटर लांब | ०१ नग |

०२. **साईनगर येथील मैदानावर शिर्डी महोत्सवाकरीता स्टेज उभारणे:-**

**दि. २९.१२.२०१२ ते दि. ०१.०१.२०१३ अखेर ०४ दिवस.**

| अ.नं. | स्टेजचा तपशिल | साईज | परिमाण |
|---|---|---|---|
| ०१ | सदरहू स्टेजवर सुमारे ४० ते ५० कलाकारांसाठी ३'-६" उंचीचे स्टेज अँगल फ्रेममध्ये मजबूत बांधी तयार करुन, स्टेजचे वरिल बाजूने भक्कम असे प्लायवूड वापरुन व मजबूत सपोर्ट देऊन ३०' X२०' साईजचे स्टेज तयार करणे, तसेच सदरहू स्टेजचे वरिल बाजूने ताडपत्री बांधून, आतिल बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधून, स्टेज फ्रेमचे चारही बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधणे, स्टेजचे पुढील भागासाठी सुशोभित एकाच रंगांचा सुमारे ३५' लांबीचा व १५' उंचीचा पडदा बसविणे. तसेच स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअपसाठी २०'X१५' साईजच्या ०२ ग्रीन रुम जाड कापडामध्ये तयार करणे. स्टेजवर व साईभक्तांना बसणेकामी १०,००० चौ. फुट मॅटीन, २००० नग फायबर खुर्च्या पुरविणे व कार्यक्रमाचे वेळी व्यवस्थीत मांडणी करुन देणे. तसेच स्टेजचे पुढील बाजूने ०२ ठिकाणी स्पीकर ठेवणेसाठी ६'X६' चे प्लॅटफॉर्म तयार करणे व स्टेजचे समोर ४' उंचीचे १५० रनिंग फुट बॅरेकेटींग करणे इ. सह. स्टेज व्यवस्था | ३०' X२०' | ६००.०० |

उपरोक्त अ प्रमाणे नाताळ सुट्टयांचे कालावधीत मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था दि. २५.१२.२०१२ ते दि. ०२.०१.२०१३ अखेर पर्यन्त ०९ दिवसाकरीता करणेकामी अंदाजे रु. ४,००,०००/- लक्ष खर्च अपेक्षित आहे. तसेच ब नूसार शिर्डी महोत्सव-२०१२-१३ निमीत्ताने दि. २९.१२.२०१२ ते दि. ०२.०१.२०१३ अखेर ०४ दिवसासाठी कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व स्वागत कमाणी उभारणी करुन घेणेकामी अंदाजे रु. ६०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच वरिल **"अ"** व **"ब"** नूसार व्यवस्था करुन घेणेकामी अंदाजे एकुण रु. ४,६०,००००/- लक्ष मात्र इतका खर्च येईल.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६.०३.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २६६ अन्वये दोन किवा अधिक सुट्यांचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी संस्थानचे मोकळ्या जागेत आवश्यक तेथे कापडी / शामियाना मंडप उभारणी करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे.

वरिलप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणारे अंदाजे एकुण रु. ४,६०,०००/- मात्रचे खर्चास व सदरहू कामी अशा प्रकारचे काम करणारे खालील मंडप ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविण्यास मा. त्रिसदस्य समितीचे दि.०८/१२/२०१२ रोजीचे सभेत मान्यता देण्यात आली असून त्यानुसार खालील ठेकेदार यांचेकडून जा.नं. एसएसएसटी/बांधकाम /१४०३१/२०१२ दि.०५/१२/२०१२ अन्वये दि.१२/१२/२०१२ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत सिलबंद निविदा मागविण्यात आल्या आहे.

| अ. नं. | मंडप फर्मचे नांव | अ. नं. | मंडप फर्मचे नांव |
|---|---|---|---|
| ०१. | कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ०९. | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर |
| ०२. | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | १०. | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर |
| ०३. | श्री. भिमराज भागुजी गाडेकर, राहाता | ११. | कला साधना डेकोरेटर्स, नाशिक |
| ०४. | रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | १२. | प्रकाश मंडप डेकोरेटर्स, वैजापूर |
| ०५. | स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर | १३. | जोंधळे मंडप डेकोरेटर्स, कोकणगांव (संगमनेर) |
| ०६. | कल्याणी टेन्ट हाऊस, नांदुर | १४. | शर्मा मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, वैजापूर |
| ०७. | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड | १५. | कुन्दन टेन्ट हाऊस, श्रीरामपूर |
| ०८. | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | | |

उपरोक्तप्रमाणे विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन निविदाधारकांना चर्चा / वाटाघाटी करिता बोलाविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांची नांवे | नाताळ सुट्यांचे कालावधीमधील शामियाना मंडप व्यवस्था दिनांक २५.१२.२०१२ ते दि. ०२.०१.२०१३ अखेर ०९ दिवस | | | | | | शिर्डी महोत्सव २०१२ - २०१३ निमित्ताची व्यवस्था | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह एकुण ५४१७१ चौ. फुट | | दर्शन रांगच्या बाजुने व साईनगर मैदानावर शामियाना मंडपासाठी वापरण्यात येणाऱ्या कापडाची ६ फुट उंचीची कनात बांधून बाहेरुन व्यवस्थेकामी ६' उंचीचे पार्टीशनची उभारणी करणे. एकूण ११०० र.फुट | | दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी बॅरेकेटींग करणे एकूण १००० रनिंग फुट | | नगर- मनमाड रोडवर व स्वागत कक्षाजवळ बॉक्स टाईप स्वागत कमाणी उभारणी एकूण ०३ नग १५ मी. लांबी कालावधी दि.३१.१२. २०१२ ते दि.०१.०१.२०१३ - ०२ दिवस | | साईनगर येथील मैदानावर शिर्डी महोत्सवा करीता स्टेज ३०'X२०' साईजचे व इतर अनुषंगीक व्यवथेची उभारगी करणे एकुण ६०० चौ. फुट कालावधी दि.२९.१२.२०१२ ते दि.०१.०१.२०१३ - ०४ दिवस | |
| | | कोटेशन मधील दर/ रक्कम | चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर | कोटेशन मधील दर/ रक्कम | चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर/ रक्कम | कोटेशन मधील दर/ रक्कम | चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर / रक्कम | कोटेशन मधील दर / रक्कम | चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर/रक्कम | कोटेशन मधील दर/ रक्कम | चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर / रक्कम |
| ०१ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | १.०० | <u>०.५५</u> | ७.०० | ५.०० | १०.०० | **<u>४.५०</u>** | ३५००/- | ३०००/- | ३७.९२ | ३०.०० |
| ०२ | कुणे टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | १.५० | ०.९५ | ७.५० | ५.९५ | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ०३ | रोशनी मंडप, संक्रापूर | १.२५ | ०.६० | ६.०० | **<u>२.५०</u>** | १५.०० | **<u>४.५०</u>** | ३०००/- | **<u>२७५०/-</u>** | २९.०० | २९.०० |
| ०४ | झुगाळे मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | १.२० | ०.६९ | ६.५० | ३.८९ | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ०५ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर | १.४० | ०.६५ | ७.०० | ३.७५ | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ०६ | कल्याणी टेन्ट हाऊस, नांदूर | १.५० | ०.९५ | ९.०० | ७.०० | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ०७ | कैलास डेकोरेटर, नगर | १.०० | ०.८० | ६.०० | ३.८० | ८.०० | ७.५० | ४०००/- | ४०००/- | ३३.३३ | **<u>२७.००</u>** |
| ०८ | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड | १.०० | अनुपस्थित | ५.०० | अनुपस्थित | --- | --- | ५०००/- | अनुपस्थित | ३०.०० | अनुपस्थित |
| ०९ | श्री.भिमराज भागुजी गाडेकर राहाता | ३.०० | ३.०० | ४.०० | ४.०० | १०.०० | १०.०० | ३०००/- | ३.०००/- | ६६.६७ | ६६.०० |

**निर्णय क्र.११०८** यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर मान्य करण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.

दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी बॅरेकेटींग करणे (एकूण १००० रनिंग फुट, ९ दिवस) या कामाकरिता बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर व रोशनी मंडप, संक्रापूर या दोन्ही मंडपधारकांचे न्युनतम दर रु.४.५० प्र.स्के.फुट प्रमाणे आहेत, त्यांना सदर कामाचा पुरवठा आदेश विभागुन देण्यात यावा, असे ठरले.

तसेच, दत्तजयंतीनिमित्त दत्तमंदिरासमोर ४०' x २०' मापाचा मंडप, गर्दीचे कालावधीत स्वागत कक्ष व मंदिर परिसराचे पुर्वेकडील मोकळ्या जागेत प्रत्येकी १५' x १५' मापाचे मंडप, पिंपळवाडी रोडवर साई कॉम्प्लेक्ससमोर दर्शन लाईनसाठी ४००' x २०' मापाचा मंडप, नगर-मनमाड रस्ता पुर्व बाजूकडील फुटपाथवर व पिंपळवाडी रस्त्याचे उत्तर बाजूकडील फुटपाथवर दर्शनरांगेसाठी अनुक्रमे ४५०' x ९' व १६०' x ७' मापाचे मंडप टाकणे आवश्यक असल्याने, सदर वाढीव मंडप बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपुर यांचेकडून वरीलप्रमाणे मंजुर दराने करुन घ्यावेत, असे ठरले. याप्रमाणे मंडपाचे संपूर्ण कामासाठी येणाऱ्या रु.४,८२,५५६/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेत आली.

**याव्यतिरिक्त दि.२५.१२.२०१२ ते दि.०२.०१.२०१३ या गर्दीचे कालावधीत काही जादा मंडपाची गरज भासलेस ते आवश्यकतेनुसार वरीलप्रमाणे मंजुर दरात करुन घेण्यास व त्यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.०६ **श्री साईबाबांचे दर्शनासाठी रेल्वेने येणाऱ्या भक्तांचे सोईसाठी कोपरगाव रेल्वेस्टेशन ते शिरडी येणे जाणेसाठी संस्थानची बस सेवा सुरु करणे बाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी हे जागतीक किर्तीचे देवस्थान असून श्री साईंचे दर्शनासाठी शिरडीस येणाऱ्या भक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. शिरडीस येणाऱ्या साईभक्तांना निवास, प्रसादभोजन, नाष्टा, चहा, कॉफी, दुध यासारख्या मुलभूत सुविधा संस्थान मार्फत माफक दरात उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यांचाच एक भाग म्हणून

१. श्री साईबाबा भक्त निवासस्थान ते श्रींचे मंदिर
२. श्री साईबाबा भक्त निवासस्थान ते प्रसादालय
३. श्री साईबाबा भक्त निवासस्थान ते साईनगर रेल्वे स्टेशन

यादरम्यान साईभक्तांना येणे जाणेसाठी विनामुल्य बससेवा संस्थानने उपलब्ध केलेली आहे.

तसेच दि.१७/०४/२००५ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.१५९ नुसार रेल्वेने नगरसुल रेल्वे स्टेशनवर उतरणाऱ्या साईभक्तांचे सुविधेकरीता दि.०६/०८/२००५ पासून शिर्डी-नगरसुल रेल्वेस्टेशन या मार्गावर संस्थानच्या दोन बसेस ना नफा ना तोटा या तत्वावर सुरु करण्यात आलेल्या आहेत. या दोन बसेस मनमाड-काकीनाडा (काकीनाडा एक्स.) या रेल्वेने जाणाऱ्या साईभक्तांना शिर्डी (नवीन भक्तनिवासस्थान) येथून नगरसुल रेल्वेस्टेशन येथे सायं.१८.३० वा. घेवुन जातात व सिकंदराबाद-मनमाड (अजंठा एक्स.) या रेल्वेने येणाऱ्या साईभक्तांना नगरसुल रेल्वेस्टेशन येथुन सकाळी ७.०० वा. शिर्डी येथे घेवून येतात.

संस्थान कडे सध्या खालील प्रमाणे एकुण १८ बसेस उपलब्ध असून त्यांचा वापर खालील तपशिलात नमूद केलेल्या कारणासाठी करण्यात येत आहे.

| अ.न. | वाहन क्रमांक | वापर |
|---|---|---|
| 1 | MH-17-C-8851 | स्कुल बस |
| 2 | MH-17-K-9370 | स्कुल बस |
| 3 | MH-17-T-8501 | स्कुल बस |
| 4 | MH-17-T-8502 | स्कुल बस |
| 5 | MH-17-T-8503 | स्कुल बस |
| 6 | MH-17-T-3101 | स्कुल बस |
| 7 | MH-17-T-3102 | स्कुल बस |
| 8 | MH-17-T-3103 | स्कुल बस |
| 9 | MH-17-T-3104 | स्कुल बस |
| 10 | MH-17-K-9371 | भक्तनिवास बस |
| 11 | MH-17-T-8504 | भक्तनिवास बस |
| 12 | MH-17-T-8505 | भक्तनिवास बस |
| 13 | MH-17-T-9501 | भक्तनिवास बस |
| 14 | MH-17-T-9502 | भक्तनिवास बस |
| 15 | MH-17-T-3301 | भक्तनिवास बस |
| 16 | MH-17-T-3302 | भक्तनिवास बस |
| 17 | MH-17-T-7109 | नगरसुल रेल्वे स्टेशन बस |
| 18 | MH-17-T-7110 | नगरसुल रेल्वेस्टेशन बस |

श्री साईसेवा ट्रस्टचे मा.कार्यकारी विश्वस्त श्री. के.व्ही. रमणी सो. यांचे देणगीतून साईभक्तांचे निवासासाठी साईआश्रम इमारत १ व २ या प्रकल्पांची उभारणी केली असून सदरचे प्रकल्प लवकरच साईभक्तांचे निवासासाठी उपलब्ध करुन दयावयाचे आहेत. सदरचे प्रकल्प चालु झाल्यानंतर त्याठिकाणी निवासासाठी थांबलेल्या साईभक्तांना श्रींचे दर्शनासाठी ने आण करणेकामी बसची सोय करणे आवश्यक आहे व याकारणासाठी एकुण ०५ बसेस ची आवश्यकता आहे. सद्याचे उपलब्ध बस संख्येनुसार सदरची गरज भागविण्यासाठी संस्थानला आणखी ०३ बसेस नव्याने खरेदी कराव्या लागतील.

उपरोक्त शिवाय आता, श्रींचे दर्शनासाठी शिरडी येथे रेल्वेने येणाऱ्या व कोपरगाव रेल्वेस्टेशनवर उतरणाऱ्या साईभक्तांची कोपरगाव ते शिर्डी येणे जाण्याची सुविधा करण्याचा प्रस्ताव आहे. भक्तांसाठी सदरची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थानची बस सेवा सुरु करावयाची झाल्यास खालील मुद्यांदाखल विचार होऊन निर्णय होणे आवश्यक राहील.

१. शिरडी ते कोपरगाव रेल्वे स्टेशन यादरम्यान भक्तांचे येणे जाणे साठी दररोज किती बसेस सुरु करावयाच्या आहेत. तसेच कोणकोणत्या रेल्वेच्या वेळेत त्या पाठविणे आवश्यक आहे ?

२. बससेवा, विनामुल्य अथवा ना नफा ना तोटा या तत्वावर योग्य तो सेवाआकार घेवुन सुरु करावयाची आहे?

३. शिरडी ते कोपरगाव रेल्वे स्टेशन असा येनकेन कारणांसाठी दररोज प्रवास करणारे काही स्थानिक लोक आहेत. बसने दररोज कोपरगाव येथे कॉलेजला जाणारे विद्यार्थी आहेत. संस्थानची बससेवा विनामुल्य उपलब्ध करुन दयावयाची झाल्यास संबधीत लोकांना संस्थानचे विनामुल्य बससेवेपासून रोखणे अडचणीचे होईल. त्यामुळे सेवाआकार घेवूनच बस सेवा सुरु करणे योग्य होईल.

४. फक्त रेल्वेने प्रवास करुन कोपरगाव रेल्वे स्टेशनला उतरणाऱ्या भक्तांसाठीच ही सुविधा करावयाची झाल्यास, शिरडी ते कोपरगाव रेल्वे स्टेशन या दरम्यान मध्ये थांबा ठेवणे योग्य होणार नाही. शिरडी येथून बस निघाल्यानंतर सदरची बस थेट कोपरगाव रेल्वे स्टेशनलाच थांबेल व कोपरगाव रेल्वे स्टेशन येथून निघालेली बस शिरडी येथेच थांबेल असे नियोजन करणे आवश्यक राहिल.

५. शिरडी नगरसुल बस सेवेकरीता आर.टी.ओ कार्यालयाकडून प्राइव्हेट सर्व्हिस व्हेईकल या सदरात श्री साईभक्तांना विनामुल्य ने आण करणेकामी परवाना मंजुर केलेला आहे, परंतु या दोन बससाठी रु.५,९४,०००/- मात्र एवढा टॅक्स प्रति वर्षी भरावा लागत आहे.याशिवाय बसेसचा रोजचा इंधन, मेन्टेंनन्स खर्च, कर्मचाऱ्यावरील खर्च, यासर्व बाबींचा विचार करुन हया बसेस "ना नफा ना तोटा" या तत्वावर चालविणेसाठी सन २००५ मध्ये ठरलेल्या कार्यलयीन धोरणानुसार बसमध्ये प्रवास करणाऱ्या एका भक्ताकडून एका बाजूचे रु.२६/- एवढी माफक दराने सेवाआकाराची रक्कम घेण्यात येत आहे. शिरडी ते कोपरगाव रेल्वेस्टेशन अशी बससेवा नव्याने सुरू करण्यासाठी ही आर.टी.ओ कार्यालयाकडून परवाना (परमिट) घेणे आवश्यक राहिल.

६. संस्थानची बससेवा शिरडी ते कोपरगाव रेल्वे स्टेशन अशी सुरु करण्यासाठी नविन बसेस खरेदी कराव्या लागतील.

७. सुरु करावयाचे बसेसचे संख्येनुसार वाहन चालक व मदतनिसांची आवश्यकता भासेल.

तरी उपरोक्त १ ते ७ मुद्यांच्या अनुषंगाने विचार होऊन, श्री साईबाबांचे दर्शनासाठी रेल्वेने येणाऱ्या भक्तांचे सोईसाठी कोपरगाव रेल्वेस्टेशन ते शिरडी येणे जाणेसाठी संस्थानची बस सेवा सुरु करणे बाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.११०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कोपरगाव रेल्वेस्टेशनवर येणाऱ्या-जाणाऱ्या रेल्वेच्या वेळापत्रकाचा विचार करुन, सध्या प्रायोगीक तत्वावर संस्थानतर्फे एक बससेवा सुरु करण्यात यावी. सदरची बससेवा सध्या चालु असलेल्या शिर्डी-नगरसुल-शिर्डी या बससेवेप्रमाणे "ना नफा ना तोटा" या तत्वावर सुरु करावयाची असल्याने, ही बससेवा सुरु करण्यासाठी आर.टी.ओ. कार्यालयाकडुन आवश्यक असलेले परवाने घेण्यात यावेत व परवानाविषयक बाबींची पूर्तता करुन सदर बससेवा सुरु करावी. यासाठी आवश्यक असणारे वाहनचालक व मदतनीस कंत्राटी पध्दतीने नेमण्यात यावेत. सदर बसला शिर्डी-कोपरगाव रेल्वेस्टेशन-शिर्डी याव्यतिरिक्त रस्त्यामध्ये बसथांबा ठेवणेत येऊ नये. कोपरगाव रेल्वेस्टेशनवर उतरणाऱ्या भक्तांचे संख्येनुसार दुसरी बससेवा वाढविण्यात यावी, असे ठरले.**

**याचवेळी चर्चेत असेही ठरले की, संस्थानकडे सध्या उपलब्ध असलेल्या बस संख्येचा विचार करता, नव्याने सुरु होणाऱ्या साईआश्रम भाग ०१ व ०२ या इमारतींमध्ये निवास करणाऱ्या साईभक्तांना बससेवा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच, कोपरगाव रेल्वेस्टेशनला पाठविण्यासाठी आवश्यक असलेल्या नवीन बसेस खरेदी करण्यासाठी/ आऊट सोर्सिंग पध्दतीने चालविणेसाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर मान्यतेसाठी सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.०७ **श्री साईबाबा संस्थानचे हॉस्पिटलमार्फत विविध आजारासंबंधी मोफत शिबीर (कॅम्प) आयोजित करणेबाबत वार्षिक नियोजन करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थानचे पुनर्गठन करुन श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ अस्तित्वात आल्यानंतर, सदर अधिनियमाच्या अधिन राहुन संस्थान मार्फत मानवतेच्या कल्याणासाठी विविध लोककल्याणकारी उपक्रम राबविले जातात. श्री साईबांबानी त्यांची सर्व हयात गोर-गरीब व समाजातील तळागाळातील गरजु रुग्णांची सेवा सुश्रुशा करणे यातच खर्ची घातली. श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुनच १९६४ साली श्री साईनाथ रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहे.

तसेच गेल्या ५० वर्षात झालेली लोकसंख्या वाढ, त्याप्रमाणात रुग्णांची झालेली वाढ, नविन उद्भवणारे आजार, रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण, लोकांच्या बदललेल्या सवयी, त्यामुळे निर्माण होणारे विविध मनोकायिक आजार, इत्यादी आजारांच्या उपचारासाठी गोर गरीब रुग्णांकरिता माफक दरात उपचार उपलब्ध व्हावेत या उद्देशाने सन २००६ साली श्री साईबाबा संस्थानने श्री साईबाबा सुपर

स्पेशालिटी हॉस्पीटल हे अद्ययावत रुग्णालय जनतेच्या सेवेसाठी सुरु केले. दोन्ही रुग्णालयामार्फत दररोज सरासरी १५०० बाहयरुग्ण तसेच ४०० आंतर रुग्णांवर तज्ञ डॉक्टरांमार्फत उपचार केले जातात. तसेच शेकडो शस्त्रक्रिया केल्या जातात.

दोन्ही रुग्णालयातील उपचार मुळांतच अत्यंत माफक दरामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तरीही दारिद्रय रेषेखालील रुग्णासाठी तसेच कमी उत्पन्न असणा-या रुग्णांसाठी ५०% पर्यंत सवलत दिली जाते. समाजातील दुर्बल तसेच गरीब रुग्णांसाठी १०% खाटा आरक्षित केलेल्या आहेत.

श्री साईनाथ रुग्णालयात सध्या ॲलोपॅथीक, होमिओपॅथीक, व आयुर्वेदीक उपचार पध्दतीने उपचार घेण्याच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्हा रुग्णालयामार्फत डॉट सेंटर व एडस् विषयी समुपदेशन व एचआयव्ही ची मोफत वैद्यकिय तपासणी करण्याची सुविधा हि रुग्णालयात सुरु करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा रुग्णालयात ह्दयरोग व मेंदूरोग हे सुपर स्पेशालिटी विभाग तसेच इतर जनरल स्पेशालिटी सेवा दिल्या जातात. महाराष्ट्र शासनाच्या जिवनदायी योजने अंतर्गत उच्च्यांकी संख्येने ह्दयरोग शस्त्रक्रिया केल्या जातात.

श्री साईबाबा संस्थानच्या नाव लौकिकास अनुसरुन व मानवतेच्या हितासाठी व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार दोन्ही रुग्णालयामार्फत मोफत शिबीरे व इतर आरोग्य उपक्रम निरंतर राबविण्यात येत आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे -

**श्री साईनाथ रुग्णालयामार्फत घेतलेले विविध शिबीरे व उपक्रम -**

(०१) मा. व्य. समितीचे सभेतील निर्णय क्र. ७४७ दि.२४/९/२०११ अन्वये श्री उपासनी कन्याकुमारी आश्रमातील कन्याकुमारीस मोफत वैद्यकिय सेवा देणबाबत निर्णय झालेला आहे. याबाबत झालेल्या ठरावाप्रमाणे श्री उपासनी कन्याकुमारी आश्रमातील कन्याकुमारीस रुग्णालयात उपलब्ध असलेल्या वैद्यकिय सेवा मोफत देणेत येत आहे.

(०२) मा. व्य. समितीचे सभेतील निर्णय क्र.३०७ दिनांक ०६/०४/२०१२ अन्वये मतिमंद मुलांकरिता कायम स्वरुपी मोफत उपचार व गोळया औषधे मिळणे बाबत निर्णय झालेला आहे. याबाबत झालेल्या ठरावाप्रमाणे दिनांक १३/०८/२०१२ रोजी पासुन मतिमंद मुलांना कायम स्वरुपी मोफत उपचार देण्यात येत आहेत.

(०३) मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. १५६ नुसार ओल्ड एज होम,द्वारकामाई सेवा ट्रस्ट कनकुरी रोड शिरडी येथील वृद्धाश्रमातील वृध्दांना रुग्णालयामार्फत आवश्यकतेनुसार दरमहा रुग्णवाहिका पाठवून मोफत औषधोपचार सेवा पुरविल्या जातात.

(०४) मा. व्यवस्थापन समिती २००६ विषय क्र. व निर्णय क्र.२५ नुसार श्री गणेश सहकारी साखर कारखाना लि.,गणेशनगर येथे गळीत हंगाम काळात आठवडयातील एक दिवस कारखाना स्थळावर कारखाना कामगार व ऊस तोडणी कामगार यांना वैद्यकीय सेवा मिळावी या दृष्टीने फिरते वैद्यकीय पथक पाठविले जाते. सन २०११- १२ मध्ये ७५० रुग्णांनी लाभ घेतलेला आहे.

(०५) श्री साईनाथ रुग्णालयामार्फत साईबाबा मंदिर परिसरात साईभक्तांच्या सेवेसाठी कायमस्वरुपी प्रथमोपचार केंद्र कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. तसेच उत्सव काळात मंदिर परिसर तसेच नवीन भक्तनिवासस्थान याठिकाणी प्रथमोपचार केंद्राची सुविधा रुग्णालयामार्फत केली जाते. याशिवाय श्री रामनवमी उत्सव काळात पालखी रोड सिन्नर ते नाशिक रोडवर फिरते वैद्यकीय पथकाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

(०६) मा.व्यवस्थापन समितीचे दि. १४/०७/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४९७ नुसार श्री साईनाथ रुग्णालयात येणा-या थैलेसेमिया बालरुग्णांच्या शरीरात वाढणा-या लोहाचे प्रमाण नियंत्रित ठेवणेकामी आवश्यक असलेल्या Iron Chelation Therapy मोफत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(०७) मा. व्यवस्थापन समितीचे दि.७/११/२००९ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार हिमोफेलिया रुग्णांना Factor VIII गरजेंनुसार मोफत देण्यात येतात. आतापर्यंत ७९२३२ युनिटस् इतके Factor VIII मोफत देण्यात आलेले आहे. त्याचे मुल्य अंदाजे रु. ८ लाख इतके होते.

(०८) शासनाच्या योजनेनुसार रुग्णालयात येणा-या थॅलेसेमिया रुग्णांना मोफत रुक्त दिले जात आहे. प्रतिमहा अंदाजे ३४ रुग्णांना लाभ देणेत येत असून याप्रमाणे वर्षाकाठी एकूण अंदाजे ४१० रुग्णांना या योजनेचा लाभ दिला जात आहे.

(०९) **श्री साईनाथ** रुग्णालयामार्फत सन २००६ पासून घेतलेल्या विविध मोफत शिबीरांची संक्षिप्त माहीती -

| अ.न. | सन | शिबीराचे नाव | कालावधी | लाभार्थी रुग्ण | एकुण शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००६ | प्लास्टीक सर्जरी शिबीर | दि.३०/०१/२००६ ते ०१/०२/२००६ | ९० | ९० |
| २ | २००६ | होमिओपॅथीक शिबीर | दि..०२/०५/२००६ व दि.७/०५/२००६ | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | २००६ | जयपुर फुट शिबीर, ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड | दि. २५/११/२००६ ते ०२/१२/२००६ | ११४ | |
| ४ | २००७ | कृत्रिम भिंगरोपन शिबीर | दि.२१/०३/२००७ ते २५/०३/२००७ | | |
| ५ | २००७ | अस्थिव्यंग शिबीर, रत्नानिधी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई | दि. २०/०७/२००७ ते २२/०७/२००७ | २७७ | |
| ६ | २००८ | किडनी स्टोन शिबीर , किडनी स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांचे सहकार्याने | दि.२०/११/२००८ ते २२/११/२००८ व दि.२०/१२/२००८ ते दि.२५/१२/२००८ | ८२ | ८२ |
| ७ | २००९ | किडनी स्टोन शिबीर , किडनी स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांचे सहकार्याने | दि.११/४/२००९ ते १३/०४/२००९ दि.२१/०५/२००९ ते दि.२३/०५/२००९ व दि.८/१०/२००९ ते | ११८ | १०८ |
| ८ | २०१० | किडनी स्टोन शिबीर , किडनी स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांचे सहकार्याने | दि.२६/०२/२०१०ते २८/०२/२०१० व दि २९/०७/२०१० ते ३१/०७/२०१० | १०५ | १०५ |
| ९ | २०११ | किडनी स्टोन शिबीर , किडनी स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांचे सहकार्याने | दि.२१/०१/२०११ ते २३/०१/२०११ दि.१९/०६/२०११ ते २१/०६/२०११ व दि.९/१२/२०११ ते ११/१२/२०११ | १४१ | १४१ |
| १० | २०१२ | किडनी स्टोन शिबीर , किडनी स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांचे सहकार्याने | दि.०३/०३/२०१२ ते ०४/०३/२०१२ दि.२२/०६/२०१२ ते २४/०६/२०१२ दि.२८०/०९/२०१२ते २९/०९/२०१२ | १४० | १४० |
| ११ | २०११ | मोफत हेअरींग एड मशिन वाटप शिबीर | दि.२८/०८/२०११ | ४३७ | ४३७ |
| १२ | २०११ | मोफत मोतीबिंदुशस्त्रक्रिया शिबीर | दि.१९०/४/२०११ ते २१/०४/२०११ | १०० | १०० |
| १३ | २०१२ | मोफत मोतीबिंदुशस्त्रक्रिया शिबीर | दि.२३/०१/२०१२ ते २६/०१/२०१२ व दि.०९/०४/२०१२ ते ११/०४/२०१२ | २०६ | २०६ |
| १४ | २०१२ | मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबीर | दि.१०/०१/२०१२ | ७६८ | ७६८ |

**(१०) श्री साईनाथ रुग्णालयामार्फत मंदिर परिसरातील प्रथमोपचार केंद्रात तसेच उत्सव काळात मोफत उपचार केलेल्या रुग्णांची माहिती.**

| वर्ष | लाभार्थी रुग्ण संख्या |
|---|---|
| २००६ - ०७ | ३११६ |
| २००७ - ०८ | १९३०३ |
| २००८ - ०९ | ४१३६८ |
| २००९ - १० | ३०४१७ |
| २०१० - ११ | २९५४३ |
| २०११ - १२ | ३९६१६ |

(११) **वैद्यकीय** आर्थिक अनुदान योजना -

मा.व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयानुसार आठ वेगवेगळया दुर्धर आजारांच्या उपचारासाठी, संबंधित आजारासाठीच्या एकूण अंदाजपत्रकीय खर्चाच्या १५% किंवा जास्तीत - जास्त रु.२५,०००/- इतकी रक्कम प्रत्येक रुग्णास दिली जाते. यासाठी व्यवस्थापन समितीने संपुर्ण भारतातुन एकूण ८५ रुग्णालये निर्धारीत केलेली आहे.

मागील पाच वर्षात आर्थिक अनुदान दिलेल्या रुग्णांची माहिती खालील प्रमाणे -

| अ.क्र. | वर्ष | लाभार्थी रुग्णसंख्या | वाटप रक्कम |
|---|---|---|---|
| १. | सन २००६-०७ | ६३१२ | रु. ९,२३,९७,३४४/- |
| २. | सन २००७-०८ | ५७४८ | रु. ८.८१,६८,४८४/- |
| ३. | सन २००८-०९ | ५०३० | रु. ८,१४,०४,२३९/ |
| ४ | सन २००९-१० | ३३८५ | रु. ५,६१,६४,१३०/ |
| ५ | सन २०१०-११ | २६७३ | रु. ४,४६,३७,३५८/- |
| ६ | सन २०११-१२- | २२१७ | रु ४,१४,३२,९६५/- |

(१२) श्री साईबाबा रुग्णालयामार्फत सन २००६ पासून घेतलेल्या विविध मोफत शिबीरांची संक्षिप्त माहीती-

| अ.न. | सन | शिबीराचे नाव | कालावधी | लाभार्थी रुग्ण | एकुण शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००६ | मोफत नेत्र चिकीत्सा व शस्त्रक्रिया शिबीर | दि.१८/०८/२००६ ते २०/०८/२००६ | १४८५ | १६४ |
| २ | २००६ | मोफत कर्क रोग निदान व सांधेदुखी शिबीर | दि.२/१२/२००६ ते ३/१२/२००६ | कर्करोग २५३ सांधेदुखी ७५५ | - |
| ३ | २००७ | सर्व रोग निदान व रक्तदान शिबीर, सिध्देश्वर देवस्थान, ट्रस्ट, मंजुर | दि.१०/०२/२००७ ते १७/२/२००७ | १४४७ रक्तदान १०० बॅग | - |
| ४ | २००७ | मोफत कर्करोग जनजागृती व निदान शिबीर, श्रध्दा फाऊंडेशन, मुंबई | दि.१५/१२/२००७ ते १६/१२/२००७ | १०१ | - |
| ५ | २००८ | सर्व रोग निदान व रक्तदान शिबीर, सिध्देश्वर देवस्थान, ट्रस्ट, मंजुर | दि.२९/२/२००८ ते ७/३/२००८ | ७०४ रक्तदान ९२ बॅग | - |
| ६ | २००८ | मोफत प्लॅस्टीक सर्जरी शिबीर | दि.२९/०२/२००८ ते २/३/२००८ | २७१ | ६० |
| ७ | २००८ | डायबेटीक रेटिनोपॅथी शिबीर | दि.७/०६/२००८ | २३ | - |
| ८ | २००९ | मोफत तिरळेपणा तपासणी शिबीर | दि.०३/०५/२००९ | ७१ | २८ |
| ९ | २००९ | सांधारोपन व दुर्बीणद्वारे सांध्याचे शस्त्रक्रिया शिबीर | दि.२७/०९/२००९ | १०१ | १८ |
| १० | २०१० | सुजोक थेरपी शिबीर | दि.८/१/२०१० ते ९/१/२०१० | २५० | - |
| ११ | २०१० | कार्डियाक व्हॉल्व रिपेअर वर्कशॉप | दि.१८/१२/२०१० ते १९/१२/२०१० | - | ०६ |
| १२ | २०११ | जयपुर फुट शिबीर | दि.२३/०४/२०११ ते २५/०४/२०११ | ३०१ | - |
| १३ | २०११ | युरो सर्जरी शिबीर | दि.११/०८/२०११ ते २१/०८/२०११ | ५८५ | ७३ |
| १४ | २०११ | कृत्रिम सांधा रोपनशस्त्रक्रिया शिबीर | दि. ०९/१०/२०११ व १/११/२०११ ते दि.३०/११/२०११ | ६० | ५० |
| १५ | २०१२ | अपंग कर्ण बधीर रुग्णाकरीता साधन सामुग्री वितरण शिबीर | दि.२१/०१/२०१२ ते २३/०१/२०१२ | १३४४ साहित्य वाटप | - |
| १६ | २०१२ | सर्व रोग निदान व औषध वितरण शिबीर | दि.०१/०५/२०१२ | १४२ | - |

उपरोक्तप्रमाणे संस्थान रुग्णालयामार्फत आतापर्यंत विविध शिबीरे, उपक्रम राबविण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन संस्थान रुग्णालयामार्फत मोफत सेवा विस्तारीकरण उपक्रमाअंतर्गत येत्या वर्षात खालील प्रमाणे आरोग्य उपक्रम व शिबीरे राबविण्याचे प्रस्तावीत आहे.

**(०१) दोन्ही रुग्णालयामध्ये आठवडयातुन एक दिवस संपुर्ण मोफत बाहयरुग्ण तपासणी कार्यक्रम-**

समाजातील दुर्बल घटक आरोग्य सेवेपासून वंचित राहु नये म्हणुन दोन्ही रुग्णालयातील बाहयरुग्ण सेवा आठवडयातुन एक दिवस मोफत देता येऊ शकेल. या दिवशी जे सशुल्क उपचार घेऊ इच्छितात अशा रुग्णांची प्राधान्याने तपासणी करुन इतर मोफत रुग्ण त्यांनतर तपासता येतील किंवा संबधित विभागात दोन तज्ञ डॉक्टर असल्यास मोफत रुग्ण सेवा व सशुल्क सेवा अशी वेगवेगळी व्यवस्था करता येईल. परंतु सदर सेवेमुळे रुग्णालयाच्या पायाभुत सुविधांवर अतिरिक्त ताण येऊन मनुष्यबळाची कमतरता भासु शकते. यावर पर्याय म्हणुन आठवडयातील प्रत्येक दिवशी केवळ एका विभागातील बाहयरुग्ण विभागात मोफत सेवा देता येऊ शकतील. त्यामुळे रुग्णालयाच्या दैनंदिन कामकाजावर ताण येणार नाही.

**(०२) बेसीक हेल्थ चेकअप -**

व्यवस्थापन समितीतील ठरावाप्रमाणे समाजातील जेष्ठ नागरीकासाठी बेसीक हेल्थ चेक अप हा उपक्रम सुरु करण्यात आलेला आहे. परंतु या कार्यक्रमाविषयी समाजात आवश्यक तेवढी जनजागृती न झाल्याने सदर उपक्रमास अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. सदर उपक्रमाचे पुनरुज्जीवन करणेकामी जनतेमध्ये जनजागरण करुन जास्त जास्त जेष्ठ नागरीकांना लाभ मिळावा या दृष्टीकोनातुन प्रयत्न करता येईल. तसेच सदर उपक्रम महिन्यातुन एकदा संपुर्ण मोफत राबविता येईल.

**(०३) मोबाईल क्लिनीक ( फिरते वैद्यकिय पथक) -**

खेडयापाडयातील, वाडयावस्तीवरील जे रुग्ण रुग्णालयापर्यत पोहोचू शकत नाही तसेच आर्थिक टंचाईमुळे किंवा अंधश्रध्देमुळे उपचारापासून वंचित राहातात अशा रुग्णांना घर पोहोच वैद्यकिय सेवा पुरविणेकामी सुसज्ज मोबाईल क्लिनीक सुरु करता येईल.

आजही अनेक कुटूंबांमध्ये महिला व बालकांच्या कुपोषणांचे प्रमाण चिंताजनक आहे. यासाठी मोबाईल क्लिनीक मार्फत महिला व बालकांना सकस आहार पुरविण्याचा उपक्रम राबविता येईल.

यासाठी एक मोठी रुग्णवाहिका आवश्यक ओपीडी रुग्ण तपासण्यासाठीची सुविधा तयार करुन त्यावर एक वैद्यकिय पथक तैनात ठेवता येईल. याद्वारे आठवडयातील एक किंवा दोन दिवस राहाता, कोपरगाव, श्रीरामपुर या तालुक्यातील वाडयवस्त्या, मळे तसेच विविध बांधकाम साईटवर काम करणारे अशिक्षित रुग्ण इत्यादी दुर स्थ ठिकाणी जाऊन रुग्णांना समुपदेशन व प्राथमिक उपचार करता येतील तसेच अशा रुग्णांना आहार विषयक मार्गदर्शक करता येईल.

सध्याची कर्मचा-यांची कमतरता विचारात घेता, मोबाईल क्लीनिक सुरु करावयाचे झाल्यास, त्यासाठी अतिरिक्त दोन वैद्यकीय अधिकारी, दोन परिचारीका, व वॉर्डबॉयची आवश्यकता भासेल. तसेच यासाठी एक मोठी रुग्णवाहिका निश्चीत करुन, सदर रुग्णवाहिकेमध्ये रुग्ण तपासून उपचार करणेसाठी आवश्यक ते अंतर्गत बदल करावे लागतील.

**(०४) मोफत मोतिबिंदु शिबीरे -**

राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमातर्गत संपुर्ण भारतात मोतीबिदु शिबीरे आयोजित केली जातात. परंतु तरीही भारतातील अंधत्वाचे प्रमाण हे चिंताजनक असे आहे. यामुळे रुग्णांचे परावलंबित्व वाढवून त्यांच्या कुटुंबाच्या क्रयशक्तीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. यासाठी साईबाबा संस्थानमार्फतही अंधत्व निवारणासाठी गावानुसार त्रैमासिक मोतीबिंदु शिबीरे आयोजित करता येतील. सदर प्रकल्पाअन्वये संबधीत गावात जाऊन नेत्ररोग तज्ञ रुग्णांची तपासणी करतील व ज्या रुग्णांना शस्त्रक्रियांची आवश्यकता असेल अशा रुग्णांना रुग्णालयात संदर्भीत करुन मोफत शस्त्रक्रिया करता येतील.

**(०५) मधुमेह निदान व उपचार शिबीर -**

दि. १४/११/२०१२ रोजी श्री साईनाथ रुग्णालयात मधुमेह तपासणी व मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले आहे. सदर केंद्राच्या माध्यमातून श्री साईनाथ रुग्णालयात वर्षातुन ३ किंवा ४ शिबीरे आयोजित करता येतील. यात रुग्णांना मधुमेहाची कारणे, प्रतिबंधक उपाय, आहार विषयक मार्गदर्शन तसेच निदान उपचार करता येतील.

तसेच डायबेटीक रेटीनोपेथी स्क्रनिंग शिबीर हे विशिष्ट तपासणी शिबीर वर्षातून एकदा आयोजित करता येईल.

**(०६) मोफत तिरळेपणा तपासणी शिबीर -**

तिरळेपणामुळे अनेक तरुण मुलामुलीमध्ये न्युनगंड निर्माण होऊन त्यामुळे त्यांच्या मानसिक वाढीवर दुष्परिणाम होतात. तसेच वैवाहिक अडचणीही उद्‌भवतात. यासाठी अशा प्रकारच्या तरुण मुलामुलीना दिलासा देण्यासाठी वर्षातुन एक तिरळेपणा शिबीर आयोजित करता येईल.

**(०७) स्क्लेरोथेरपी (मुळव्याधीवर इंजेक्शनद्वारे उपचार शिबीर) -**

मुळव्याधीमुळे अनेक रुग्ण त्रस्त असून याचा रुग्णांच्या कामावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे रुग्णांना ॲनमिया होऊन प्रतिकार शक्ती कमी झाल्याने विविध आजार उद्‌भवतात. यासाठी वर्षातून दोन किंवा तीन मुळव्याधीवर उपचार शिबीरे आयोजित करता येतील.

**(०८) कृत्रिम सांधेरोपन शिबीर -**

ज्या रुग्णांचे खुबे अथवा गुडघे संपुर्ण घासले जाऊन उपचारास प्रतिसाद देत नाहीत अशा रुग्णांवर सांधेरोपन अथवा दुर्बीनीद्वारे शस्त्रक्रिया शिबीर वर्षातुन एक आयोजित करता येईल.

**(०९) जयपुर फुट शिबीर -**

अपंग रुग्णासाठी कॅलिपर्स, कुबडया, वॉकर्स, जयपुर फुट, व्हिल चेअर इत्यादी साधन सामुग्री वितरण शिबीर वर्षातून एक घेता येईल. यासाठी सदर सहित्य तयार करणा-या स्वयंसेवी संस्थेची मदत घेता येईल.

**(१०) कर्करोग जनजागृती शिबीर -**

लोकांची वाढती व्यसनाधिनता, धुम्रपान, मद्यपानाच्या वाढत्या सवयी, स्पर्धेमुळे जिवनातील ताण तनाव, सकस आहाराचा अभाव, इ कारणांमुळे भारतील कर्करोगाचे प्रमाण भितीदायक प्रमाणात वाढत आहेत. हे रोखण्यासाठी समाजामध्ये जनजागृती करणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी संस्थानमार्फत विविध माध्यमातुन कालबध्द पध्दतीने कर्करोग जनजागृती शिबीरे आयोजित करता येतील.

उपरोक्त शिबीरे प्रकल्प व आरोग्य उपक्रमांबाबत वैद्यकीय संचालक यांची मा. जिल्हा शल्यचिकित्सक यांचेबरोबर दुरध्वनीद्वारे चर्चा झाली असुन मा. जिल्हा शल्यचिकित्सक यांनी आदिवासी भागांमध्ये सर्वरोगनिदान शिबीरे आयोजित करुन गरुजू रुग्णांवर संस्थान रुग्णालयांमध्ये मोफत उपचार करणेबाबत सुचना केली आहे. तसेच सर्पदंशावरील उपचार मोफत करण्यात यावे असेही सुचविले आहे.

उपरोक्तप्रमाणे विविध उपक्रम व शिबीरे राबवून संस्थानच्या नाव लौकिकात वाढ होईल तसेच संस्थानचे सामाजिक दायीत्व अधोरेखीत होऊन मानवतेच्या कल्याणासाठी साईबाबा संस्थान कटीबध्द असल्याचा योग्य तो संदेश समाजात जाईल, असे मत आहे.

उपरोक्त शिबीर प्रकल्पाचा नियोजनबध्द व कालबध्द आराखडा तयार करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करता येईल.

तरी सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.१११० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात मान्यता देण्यात आली. याबाबत वैद्यकिय संचालक, श्रीसाईबाबा हॉस्पिटल व वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ हॉस्पिटल यांनी जिल्हा शल्य चिकीत्सक, अहमदनगर यांचेशी चर्चा करुन, उपरोक्त शिबीर प्रकल्पाचा नियोजनबध्द व कालबध्द आराखडा तयार करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ वैद्यकिय अधिक्षक)

---

विषय नं.०८ **संस्थानचे श्री साईप्रसादालय, प्रसादलाडू व नाष्टा पाकिटे यासाठीचे वार्षीक परवान्याबाबत.**

प्रस्ताव- साईभक्तांचे सोईसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी मार्फत सन १९७३ पासून प्रसादालय (प्रसादभोजन) चालू करण्यात आलेले आहे. तसेच सन १९९३-१९९४ पासून प्रसादालयामध्ये प्रसाद लाडू व अन्नपाकीटे तयार करुन विक्री करण्यात येते. प्रसादालयामध्ये प्रसादभोजन प्रसादलाडू व अन्नपाकीटे निर्मितीसाठी महाराष्ट्र शासनाचे अन्न व भेसळ प्रतिबंधक नियम १९६२ नूसार अन्न व औषध प्रशासन (म.रा.) अहमदनगर कार्यालयाकडून परवाना घेण्यात आलेला होता. त्याचा क्रमांक अन/राहाता/ शिर्डी/३७२/२००८ असून परवान्याची मुदत ३१/१२/२०१२ अखेर आहे. सदर परवान्यावर प्रसादभोजन, प्रसाद लाडू व अन्नपाकीटे तयार करण्यासाठी मर्यादा नमूद केलेली नव्हती. त्यामुळे दर्‍रोज सरासरी ३५,००० व गर्दीचे प्रमाणात २५,००० ते ८५,००० पर्यंत भक्तांचे प्रसादभोजन तसेच दर्‍रोज सरासरी ६.५ टन (६५ क्विंटल) गर्दीचे प्रमाणात ३.६६ टन ते १४.६४ टनापर्यंत प्रसाद लाडू तयार करण्यात येत आहेत. प्रति भक्तास फक्त २ पाकीटे देण्यात येत होते. त्याचप्रमाणे दर्‍रोज सरासरी ८००० अन्नपाकीटे गर्दीचे प्रमाणात ६५०० ते २०,००० नग पर्यंत अन्नपाकीटे तयार करण्यात येत आहेत.

ऑगस्ट २०११ पासून अन्न सुरक्षा व मानके कायदा-२००६ व नियम २०११ हा नविन कायदा संमत झालेला आहे. पुर्वी महाराष्ट्र शासन अन्न भेसळ प्रतिबंधक नियम १९६२ या कायद्याखाली घेतलेल्या परवान्याचे रुपांतर /नुतणीकरण करण्यासाठी दिनांक १७/०७/२०१२ रोजी प्रस्ताव महाराष्ट्र शासन अन्न व औषध प्रशासन, कार्यालय अहमदनगर यांचेकडे सादर करण्यात आलेला होता.

सदर दिनांक १७/०७/२०१२ रोजी सादर केलेल्या प्रस्तावानूसार अन्न व औषध (म.रा) अहमदनगर यांचे कार्यालयाकडून फक्त प्रसादभोजन, चहा, कॉफी व प्रसादपाकीटे (अन्नपाकीटे) निर्मितीसाठी नवीन परवाना दिलेला आहे. त्याचा परवाना क्रमांक - ११५१२०३३००१६७७ असा आहे. प्रसादलाडू निर्मितीसाठी रुपांतर /नुतणीकरण करुन दिलेले नाही. मात्र सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन (म.रा.) यांचे कार्यालयाकडून परवाना क्रं.११५१२०३३००१६७७ मुदत १७/०७/२०१२ ते १६/०७/२०१७ आहे. लाडू निर्मितीसाठी परवान्याचे रुपांतर/नुतनीकरण करुन दिलेले नाही. सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन (म.रा.) यांचे कार्यालयाकडून जा.क्रं असुमाका /४९९४A/ १२/३ दि.३०/०८/२०१२ व जा.क्र.असुमाका/४९८४/१२/३ दि.३०/०८/२०१२ चे पत्राव्दारे कळविलेले आहे की - आपले पेढीस प्रसादाकरीता बुंदी लाडूचे प्रतिदिन उत्पादन २० क्विंटल (२ टन) पेक्षा जास्त असल्याचे आढळल्यामुळे व आपण केंद्रीय पदनिर्देशित आधिकाऱ्याचे कार्यक्षेत्रात समाविष्ट होत असल्याने उपरोक्त सुचनांचे पालन करुन त्वरीत फॉर्म बीड नमुन्यातील अर्जाव्दारे केंद्रीय पदनिर्देशित अधिकारी बांद्रा, मुंबई यांचेकडून लाडू निर्मितीचे परवान्याचे रुपांतर करुन घ्यावे.

प्रसाद लाडूचे संदर्भात तातडीची गरज म्हणून जुन्या प्रसादालय किचनमध्ये लाडू निर्मितीसाठी दि. २०/१०/२०१२ रोजी व नविन प्रसादालयातील किचनमध्ये लाडू निर्मितीसाठी दि. ०५/१२/२०१२ रोजी प्रस्ताव अन्न व औषध प्रशासन (म.रा) अहमदनगर कार्यालय यांचेकडे सादर करण्यात आलेला होता. त्यानूसार अन्न व औषध प्रशासन (म.रा) अहमदनगर कार्यालयाकडून जुन्या प्रसादालयातील किचनमध्ये १.५ टन व नविन प्रसादालयातील किचनमध्ये २.०० टन लाडू निर्मितीचा परवाना दिलेला आहे. त्याचा अनुक्रमे क्रमांक-११५१२०३३००१९१९,११५१२०३३००१९२१ असे आहेत.

साईभक्तांसाठी दर्‍रोज सरासरी ६.५ टन प्रसादलाडू निर्मितीची गर्दीचे प्रमाणानूसार कमीतकमी ३.६६ व जास्तीत जास्त १४.६४ टन प्रसाद लाडू निर्मितीची गरज आहे. मात्र दोन किचन मिळून नविन परवाना फक्त ३.५ टन लाडू निर्मितीचा मिळालेला आहे. त्यामुळे साईभक्तांची गैरसोय होणार आहे. प्रसादलाडूच्या नविन परवान्यामुळे प्रति भक्तास १-१ पाकीट देणेही अडचणीचे ठरणार आहे.

अन्न व औषध प्रशासन (म.रा) अहमदनगर कार्यालयाकडून प्रसादभोजन व अन्नप्रसाद पाकीटे तयार करण्यासाठी परिमाणाची मर्यादा घातलेली नाही. त्यामुळे साईभक्तांची प्रसादभोजन व अन्नप्रसाद पाकीटे पुरविणेसाठी अडचण येणार नाही. मात्र लाडू निर्मितीचे परिमाणास मर्यादा घालण्यात आल्यामुळे भक्तांना गरजेनूसार प्रसादलाडू निर्मितीसाठी परवाना घेणेसाठी सेंट्रल गर्व्हमेंट कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करुन गरजेइतके प्रसादलाडू बनविण्यासाठी परवाना घेणे आवश्यक आहे.

तरी साईभक्तांचे गरजेप्रमाणे लाडू निर्मितीचा परवाना घेणेसाठी सेंट्रल गर्व्हमेंट कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणे व त्याकामी येणाऱ्या अनुषंगिक प्रत्यक्ष खर्चाचे मान्यतेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन (त्रिसदस्सीय) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१११११ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे गरजेप्रमाणे लाडू निर्मितीचा** परवाना घेणेसाठी सेंट्रल **गव्हर्मेंट कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणे व त्याकामी** येणाऱ्या अनुषंगिक प्रत्यक्ष खर्चास **मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

आयत्या वेळेचा

विषय नं.०१ **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

निर्णय क्र.१११२ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** संस्थानमधील सिक्युरिटी (कायम/ कंत्राटी) गार्ड यांना प्रशिक्षण देणेसाठी जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी सहकार्य करावे. त्यासाठी सुरुवातीला एक निवडक सिक्युरिटींचा गट तयार करणेत येऊन प्रशिक्षण चालु करणेत यावे. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

**(२)** अहमदनगर जिल्हयातील आदीवासी व दुर्गम भागात वैद्यकिय अधिकारी अथवा खाजगी व्यावसायिक वैद्यकिय अधिकारी उपलब्ध नसतात, त्यामुळे अहमदनगर जिल्हयातील सर्व आदिवासी-दुर्गम भागांत श्री साईबाबा संस्थानतर्फे फिरती वैद्यकिय पथके नियमीत पाठवून या भागातील गरजू लोकांना संस्थानमार्फत मोफत वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देण्यात यावी, असा प्रस्ताव मा.अध्यक्ष महोदयांनी मांडला. यावर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलचे वैद्यकिय संचालक व श्री साईनाथ रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक मा.जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेशी सविस्तर चर्चा करुन या विषयी प्रस्ताव तयार करुन मा.व्यवस्थापन समिती सभेपुर्वी सादर करणेत यावा. मात्र तत्पुर्वी वैद्यकिय संचालक यांनी अहमदनगर जिल्यातील सर्व आदीवासी व दुर्गम भागाची समक्ष पहाणी करुन, योजना तयार करुन नंतर प्रस्ताव सादर करावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ वैद्यकिय अधिक्षक)

**(३)** शिर्डी नगरपंचायत हद्दीत वाहत असलेल्या लक्ष्मीनगर नाल्यामध्ये शिर्डी शहरातील व संस्थानचे सांडपाणी सोडलेले आहे. सदर नाल्यामध्ये घाण साचलेली असून पाण्याची दुर्गंधी सुटलेली आहे. त्यामुळे शिर्डीमध्ये प्रवेश करताना तसेच प्रसादालयाकडे जाताना-येताना साईभक्त व स्थानिक नागरीकांना दुर्गंधी सहन करावी लागत आहे. त्यामुळे सदर नाल्याची साफसफाई संस्थानमार्फत त्वरीत करुन घेण्यात यावी. याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

**(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ आरोग्य विभागप्रमुख)**

---

वरील निर्णय क्र. ११०४ ते १११२ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| (स्वाक्षरीत) | (स्वाक्षरीत) |
| (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी